


# लोकबिरादरी एक आठवण



गौरव नायगांवकर

# लोकबिरादरी एक साठवण

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# लोकबिरादरी एक साठवण

लेखक

गौरव अविनाश नायगांवकर

लोकबिरादरी एक साठवण

लेखक... गौरव अविनाश नायगांवकर

फोन नंबर : 8237165405.

पत्ता: प्लॉट 48, गट नं 91, सम्राट नगर, सातारा परिसर, औरंगाबाद, महाराष्ट्र

**मेल: gau.nai@aol.in**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २५ ऑक्टोबर २०२० (सीमोल्लंघन)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी-

## गौरव अविनाश नायगांवकर.



शिक्षण:BE (Mechanical engineering), MBA in Human resource management. PGD in Marketing and Sales.

छंद: लेखन, वाचन, चित्रकला.

लिखाण : 1. "प्रथमेश : एक पार्टनर"हे इ बुक

( 6 मे 2017 रोजी प्रकाशित झाले)हस्ते: श्री विवेक सावंत, MKCL चे प्रमुख.

हेच पुस्तक 'प्रिंट व्हर्जन' मध्ये "मना समर्था" ह्या नावाने लवकरच, लोकव्रत प्रकाशनतर्फे प्रकाशित होणार आहे.

2. अल्टरनेटिव्ह पॅराडाईम( भगवद गीता आणि मॅनेजमेंट ह्यांच्यावर आधारित ह्या पुस्तकाचे लिखाण सुरू आहे.)

3. दुसरे पुस्तक ,(ज्याचे नाव ठरलेले नाही,) जे तरुणाईवर आधारित आहे, ते वर्षभरात पूर्ण होईल.

4. तिसरे पुस्तक, जे sci-fi प्रकारातील आहे, त्याचं ही लिखाण सुरू आहे.

कथा: आजपर्यंत साधारण 20 पेक्षा अधिक कथा.

इतर: fc रोड ह्या e-magazine मध्ये करियर आणि इतर विषयांवर 15 पेक्षा अधिक आर्टिकल्स.

"प्रतिलिपी मराठी, न लिहिलेली पत्रे ह्या फेसबुक पेजेसवर अनेकदा लिखाण".

विद्यार्थ्यांना मोफत जॉब विषयी मार्गदर्शन करतो "Career Designer" ह्या फेसबुक पेजवर ..

ब्लॉग: https://gauravbeing.blogspot.com

"नुक्कड कथा लेखक कार्यशाळा , औरंगाबाद येथे आयोजित करण्यात सहायक"

"नुक्कड साहित्य संमेलन,2018, औरंगाबाद साठी आयोजक".

आवडते लेखक :  पु ल देशपांडे, व पु काळे ,भालचंद्र नेमाडे, वि स खांडेकर, आचार्य अत्रे, इत्यादि.

अर्पणपत्रिका:

आदिवासी बांधवांसाठी अहोरात्र झटणाऱ्या

आमटे कुटुंबियांना समर्पित.

गौरव

## मनोगत:

सर्व वाचकांना माझा सप्रेम नमस्कार.

"लोकबिरादरी: एक साठवण" हे माझं e Book प्रकारातील दुसरं पुस्तक.

मी काही काळ हेमलकसा इथल्या लोकबिरादरी प्रकल्पात घालवला होता, तिथल्या अनुभवांची ही साठवण.

प्रकाश आमटे सर आणि मंदा ताईंच्या कार्यात सहभागी झाल्याचा हा अनुभव आहे. हा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी अनिकेत आमटे सरांचा आणि समीक्षा गोडसे-आमटे ताईंचा मनोमन आभारी आहे.

ह्या अनुभवाचं पुस्तक होण्याचं श्रेय मी देतो, ते निरंजन जोशी ह्या सद्गृहस्थांना. त्यांनी ह्यावर एक पुस्तक प्रकाशित व्हावं, अशी इच्छा व्यक्त केली. ई_ साहीत्य ह्या प्रकाशन संस्थेचं नावही सुचवलं. ई_साहीत्यच्या सुनीळ सामंत सरांशी इमेल द्वारे चर्चा होऊन पुढच्या घडामोडी घडल्या.. अन त्यांच्या टीमच्या अथक परिश्रमाने हे पुस्तक तयार झालं. मी ह्या सर्वांचा ऋणी आहे.

गौरव अविनाश नायगांवकर, औरंगाबाद

## प्रस्तावना



## श्री. अनिकेत प्रकाश आमटे

गौरव नायगावकर चा अचानक एक दिवस मला ईमेल आला. मला लोक बिरादरी प्रकल्प मध्ये काम करायचे आहे म्हणून. आधी त्याची मी पूर्ण विचारपूस केली. भावनेच्या आहारी जाऊन नोकरी सोडून येऊ नकोस असे स्पष्ट सांगितले. त्याने पूर्ण विचार करून प्रकल्पात येण्याचा निर्णय घेतला. अनायसे नेलगुंडा च्या साधना विद्यालय येथील शिक्षकाची जागा रिक्त झाली होती. त्याला तिथे शिक्षक म्हणून काम करायची संधी दिली. अतिशय उत्तम कार्य त्याने केले. आपल्या कामाशी तो अतिशय प्रामाणिक आहे. विद्यार्थ्यांवर त्याने भरपूर प्रेम केले. विद्यार्थ्यांनी सुद्धा त्याला खूप प्रेम दिले. त्याने लिहिलेले हे अनुभव इतर सर्व काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी नक्कीच प्रेरणा दायक ठरतील. कार्यकर्ता कसा असावा याचे एक चांगले उदाहरण म्हणजे गौरव आहे.

त्याला पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.
अनिकेत आमटे
संचालक,
लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा.

# लोकबिरादरी एक साठवण

गौरव अविनाश नायगांवकर



# १. साठवणींची सुरवात

लहानपण मस्त असतं. आपल्याला काहीच्या काही गोष्टी करायच्या असतात.. पायलट व्हायचं असतं, तसंच रेल्वे ही चालवायची असते, पंतप्रधान ही बनायचं असतं आणि त्याचवेळेस पिठाच्या गिरणीत काम करून पांढरं ही व्हायचं असतं.. पण 15,16 वर्षांचं होईस्तोवर ही स्वप्न मागे पडतात अन आपण डॉक्टर, इंजिनिअर अशी कमाईवाले स्वप्न पहायला लागतो.. माझी स्वप्नंही फारशी वेगळी नव्हती.. पण आत कुठेतरी, खोलवर एक निराळं स्वप्न किंवा इच्छा दडून बसली होती. ते म्हणजे मोठं झाल्यावर, म्हणजे बऱ्यापैकी पैसे कमावल्यावर जंगलात जाऊन, तिथल्या आदिवासींसोबत त्यांच्यासारखंच घर बांधून, ते खातील ते खायचं, तसंच रहायचं..किमान काही वर्षं तरी. आता असलं हे जगावेगळं स्वप्न, ही इच्छा कुठून निर्माण झाली, ह्याबद्दल मलाही कल्पना नाही.

पुढे जाऊन शिक्षण, करियरच्या धबडग्यात ही इच्छा काहीशी मागे पडली.. अधूनमधून काही जणांना मी बोलूनही दाखवायचो.. पण एकतर सरळ तोंडावरच मला वेड्यात काढलं जायचं, नाहीतर पाठ वळल्यावर कुत्सितपणे हसणं तरी व्हायचं.

पण माझी इच्छा पुरेशी तीव्र असावी. देवाच्याच मनात माझं स्वप्न पूर्ण करण्याचं असावं.

डॉ. प्रकाश आमटे ह्यांच्याबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल लहानपणापासूनच ऐकत, वाचत आलेलो. असंच एकदा मला हेमलकसाची माहिती मिळाली..लोक बिरादरी प्रकल्पाचं काम समजलं.

पण करियर,कामाच्या व्यापात फारशी काही हालचाल करता येत नव्हती. मला आठवत, नोकरी करत असतानाच एकदा मी 'लोकबिरादरी प्रकल्प'साठी कार्यकर्ता किंवा असाच काही पदासाठी एक ऑनलाईन फॉर्म भरून दिला होता. अगदी 3,4 पानांचा मोठा फॉर्म होता तो. पण दुर्दैवाने 2,3 वेळा पूर्ण भरून ही तो सबमिट होत नव्हता. असेच काही वर्ष गेली.

इकडे मनाची अस्वस्थता मात्र बैचेन करत होती. शेवटी, fb वर डॉ. दिगंत आमटे ह्यांचा ई-मेल id मिळवला. त्यांना पत्र लिहून माझी हेमलकसाला यायची ईच्छा कळवली. त्यांनी मला अनिकेत आमटे सरांचा मेल id दिला. अनिकेत सरांशी मेलद्वारे, व्हाट्सएप द्वारे अनेकवेळा बातचीत झाली. प्रकल्पात येऊन मला काय करता येऊ शकतं? हे ठरवलं.

तो दिवाळीचा काळ होता. घरी सांगणं क्रमप्राप्त होतं. नोकरी सोडून हे असलं काही करायला परवानगी मिळणं अशक्यकोटीच्या पलीकडलं होतं. पण जमवलं. कारण आता जर मी हेमलकसा टाळलं असतं, तर पुन्हा कधी जमेल की नाही, उत्साह टिकेल का? ह्याबद्दल शंका होती. दिवाळी साजरी झाल्यावर घरच्यांनी काळजावर दगड ठेऊन मला निरोप दिला. प्रवास लांबचा होता. औरंगाबाद ते हेमलकसा साधारणतः 750 किमीचं अंतर.. थंडीचे दिवस. औरंगाबाद वरून रेल्वेने चंद्रपूरला अन तिथून प्रायव्हेट कार करून मजल दरमजल करत मी सायंकाळी साधारणपणे साडे चारच्या दरम्यान हेमलकसाला पोहोचलो. गाडीतून उतरून बॅग सावरत मी 'लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा' अशी पाटी असलेल्या कमानीसमोर उभा राहिलो. खरं सांगतो, किमान दोन मिनिटं तरी मी भान हरपून त्या प्रवेश दाराकडेच पाहत होतो. डोळे, का कुणास ठावूक, पाणावले होते. काहीतरी मिळाल्याची, गवसल्याची भावना उचंबळून आली होती. त्याच अवस्थेत मी प्रकल्पात पहिलं पाउल ठेवलं. आठवणींची साठवण व्हायला सुरवात झाली होती.


लोक बिरादरी प्रकल्प , हेमलकसा (L.B.P.)
सुस्वागतम्

# २. अजी म्या ब्रह्म पाहिला

लहानग्या नामदेवांना साक्षात विठ्ठल प्रसादाचं ग्रहण करताना बघायचं भाग्य लाभलं होतं. विठ्ठलावर माझं प्रेम असलं तरी, ते भाग्य मला  लाभणार नाही.. पण कुठेतरी पुण्य कामी आलं, अन माणसातल्या देवाला, माझ्या ह्या डोळ्यांनी, स्वतःच्या समोर बसून जेवण करताना पाहणं, ह्या पेक्षा अधिक सुखद दृश्य कोणतं असू शकतं?

मी लोकबिरादरीत पाऊल टाकलं. भारावून जाऊन इकडे तिकडे पाहत, तिथला रस्ता, दवाखान्याची इमारत, हॉस्टेल डोळ्यात भरून घेत घेत..

तिथल्या कार्यकर्त्याला म्हणजे विजय सडमेक ला भेटलो,स्वतःची माहिती सांगितली. अनिकेत सर प्रकल्पात नव्हते. त्यांनी फोनवरुन कार्यकर्त्याला माझी सोय करण्यास सांगितलं. सचिन मुक्कावर ह्यांनी ऑफिसच्या बिल्डिंगमध्ये असलेल्या गेस्ट रूम मध्ये जागा करून दिली. आता खरं सांगायचं झालं तर, माझी अपेक्षा होती की, एखाद्या गर्दीच्या तीर्थक्षेत्र वगैरे ठिकाणी जशी राहण्या खाण्याची सोय असते, तशी इथे ही असणार. म्हणजे

थोडंफार अस्वच्छता किंवा असंच. अर्थात माझी त्यासाठीही तयारी होती. पण इथली बातच सगळी न्यारी. गेस्ट रूम माझ्या स्वतःच्या खोलीपेक्षा स्वच्छ आणि नीटनेटकी होती. अगदी पलंगावरच्या चादरीवरही सुरकूती नव्हती वा धुळीचा थर नव्हता, इतकं सगळं टापटीप होतं. प्रवासानंतर थकवा जाणवत होता. अंग आंबलं होतं. गरम पाण्याची नितांत गरज होती, आणि दिमतीला गरम पाणी होतं. प्रकल्पात जवळपास सगळीकडे सोलर एनर्जीचा उपयोग  करून घेऊन वीज वाचवली जाते. गेस्ट रूम मध्ये ही सोलरचं गरम पाणी 24 तास उपलब्ध होतं. हेमलकसाला फक्त बीएसएनएलचं नेटवर्क उपलब्ध आहे. त्यामुळे माझा फोन बंद होता.तिथल्याच एका कार्यकर्त्यांच्या फोनवरून मी घरी सुखरूप पोहचल्याचं कळवलं होतं.

आवरून, थोडी विश्रांती घेऊन मी मेस मध्ये जेवायला गेलो. प्रकल्पात कोणत्याही दिवशी साधारणतः 75 ते 100 गेस्ट भेट देण्यासाठी असतातच. त्यांच्या राहण्याची, नाश्ता-जेवण्याची सोय प्रकल्पातर्फेच केली जाते.(अन तेही आत्मीयतेने!)

गेस्टसाठी असणारा पास गळयात घालून मी मेसमध्ये आलो. गेस्टसाठी जेवणाची वेळ साडेसातची असते, पण मी काहीसा आधीच पोहोचलो होतो. इथे स्वावलंबन पद्धतीने स्वतःच हाताने

वाढून घ्यायचं असतं. मी ताट घेऊन जेवण वाढून घेतलं. समोरच्या ताज्या पदार्थांनी भूक चाळवली होती. एक टेबल पकडून मी जेवण सुरू केलं.. आणि समोरच्या टेबलावर साक्षात प्रकाश सर आणि मंदा ताई! दोघेही शांतपणे जेवत होते. मी जे जेवण करत होतो, तेच तेही खात होते, अगदी आम्हा इतरासारखच टेबल खुर्ची घेऊन. ना कसला भपकेबाजपणा, ना कसला बडेजाव. त्या देवमाणसांना समोर जेवताना बघूनच माझं पोट भरल्यासारखं वाटू लागलं. फक्त कल्पना करा, ज्यांच्याबद्दल आपण नेहमी ऐकतो, बोलतो, अशी माणसं तुमच्यासमोर ,तुमच्यासोबत बसून जेवण करत आहेत!

त्यावेळी मला नेमकं काय वाटलं, ते वर्णन करायला मला प्रयत्न करूनही शब्दात मांडता येत नाहीये. तो अनुभव वर्णातीत आहे.

माणसातल्या देवांना माझ्या डोळ्यासमोर जेवण करताना पाहण्याचं भाग्य माझ्या नशिबी लिहिल्याबद्दल त्या जगन्नियत्याचे मनोमन आभार मानले. गेले सहा सात महिने सातत्याने संपूर्ण आमटे कुटुंबातील सदस्य आणि प्रकाश सरांचे सहकारी असलेले श्री विलास मनोहर, सौ रेणुका मनोहर, श्री बबन पांचाळ आणि कुटुंब, श्री मनोहर यम्पलवार आणि कुटुंब, श्री गोपाळ फडणीस आणि कुटुंब अशा अनेकांसोबत उदरभरण करण्याचं सद्भाग्य

देणाऱ्या परमेश्वराचं ऋण फेडण्याचा अपुरा प्रयत्न, मी दररोज जेवताना समोरच्या अन्नाला नमस्कार करून करत असतो.





# ३.लोकबिरादरी जाणून घेताना

"डॉ. प्रकाश आमटे" ह्यांच्या जीवनकार्यावर आधारित नाना पाटेकर यांचा सिनेमा आपण पाहिला असेलच.

सिनेमात घडणाऱ्या घटना पाहून आपण मनोमन प्रकाश सरांना सलाम ठोकतो, भारावून जातो. प्रकाश सरांचं तेच कार्य प्रत्यक्षात पाहण्याचं, तेही दररोज, एक मोठी भाग्याची गोष्ट आहे माझ्यासाठी.

पहिल्या दिवशी संध्याकाळी जेवण झाल्यावर रात्री 8 वाजता मी डॉक्युमेंटरी हॉल मध्ये गेलो. दररोज येणाऱ्या गेस्टसाठी इथे प्रकाश सर आणि मंदा ताई, त्यांचे सहकारी आणि लोकबिरादरी प्रकल्प ह्याबद्दल साधारणतः तासाभराची फिल्म दाखवली जाते. नाना पाटेकरच्या सिनेमातील सीन जिथे घडले ती ठिकाणं, वस्तू आणि वास्तू सर्वच इथे आल्यावर नजरेस पडतात. त्या डॉक्युमेंटरी फिल्म मध्ये प्रकाश सरांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पहिली दिवसापासून केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आलाय. इथल्या हॉस्पिटलमूळे आदिवासींना झालेला फायदा पाहून, त्यांचं

आरोग्यासाठी घेतली जाणारी मेहनत, डिलिव्हरी साठी आलेल्या महिलांना दिल्या जाणाऱ्या उच्च दर्जाच्या सुविधा, दूर जंगलात असलेल्या ठिकाणी गावोगावी हेल्थ सेंटर स्थापन करून प्रत्येक आदीवासीला निरोगी ठेवण्याची तळमळ.. सगळं सगळं अचंबित करणारं आहे. सकाळी आरामात उठून पेपर वाचत दुःखद घटनांवर नुसता खेद व्यक्त करणाऱ्या तुमच्या-माझ्या सारख्यांना जाग आणणारं हे कार्य आहे.

आज इथे उपचाराअभावी घडणाऱ्या मृत्यूचं प्रमाण अत्यंत कमी आहे. डॉक्युमेंटरी पाहताना इथल्या सर्वांची जिद्द, तडफ, दुर्दम्य इच्छाशक्ती ह्या सर्वांची जाणीव मनाला उभारी देते. इथल्या शाळेत शिकून आदिवासी मुलं आज डॉक्टर, इंजिनिअर, वकील बनत आहेत. समाजाचा आणि पर्यायाने भारताचा एक भाग बनत आहेत.ही डॉक्युमेंटरी फिल्म स्वतःच अनुभवावी अशी आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी भरपेट नाश्ता केल्यावर मी इतर गेस्टसोबत मी परत एकदा डॉक्युमेंटरी हॉल मध्ये जमलो ते आमटे कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधायला. आमच्याशी बोलायला आले होते, ते डॉ. दिगंत आमटे. दिगंत सरांनी हॉस्पिटल आणि

प्रकल्पसंबंधात सद्यस्थितीची माहिती दिली.गेस्टमधल्या लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं दिली, अगदी वैयक्तिक सुद्धा.

संवाद साधून झाल्यावर सर्वांनी दिगंत सरांसोबत एक फोटो काढला. त्यानंतर सुरू झाला आमचा 'राऊंड'. ह्यात प्रकल्पातल्या अनेक जागा दाखवल्या जातात. जसं की, आदिवासींच्या मुलांसाठी चालू केलेली शाळा, हॉस्टेल, त्यांच्यासाठी असलेली अद्ययावत कम्प्युटर लॅब, भलंमोठं ग्राउंड.. हॉस्पिटलचाही एक राऊंड असतो, ज्यात तिथं उपलब्ध असणाऱ्या सुविधा आणि डॉक्टर्स बद्दल माहिती दिली जाते.

पण सर्वात आनंददायी, कायमचं मनावर कोरलं जाऊ शकेल अशी गोष्ट म्हणजे 'प्राणी अनाथालय'चा राऊंड. प्राण्यांना शिकारीपासून जीवनदान देण्यासाठी सुरू केलेलं हे अनाथालय. अनेक प्रकारचे प्राणी, पक्षी इथं आनंदानं जगत आहेत. हा राऊंड अविस्मरणीय अनुभव ठरण्याचं कारण म्हणजे, बऱ्याचदा प्रत्यक्षात प्रकाश सर आपल्यासोबत असतात.. तिथल्या प्राण्यांची कहाणी त्यांच्याकडूनच ऐकणं म्हणजे सोने पे सुहागा! किती अन कसं ते सर्व साठवून घेऊ? असं होतं.

(पण मी ज्या दिवशी हा राऊंड घेतला, नेमकं त्याच दिवशी प्रकाश सर राऊंडला नव्हते.  त्यांच्यासोबत एक राऊंड करण्याची इच्छा मी अजूनही बाळगून आहे. खरं सांगायला हरकत नाही, की इतर गेस्ट जेव्हा त्यांच्यासोबत राऊंड घेतात, तेव्हा मला मनात असूया वाटते. मला कधी मिळणार हे भाग्य? असा दररोजच प्रश्न पडतो.)

राऊंड वगैरे सर्व संपल्यावर आम्ही सकाळी 11 ला जेवायला आलो. 2 तासांच्या राऊंडनंतर सपाटून भूक लागली होती. इतर सर्व गेस्ट जेवण करून आपापल्या घरी जायला निघाले. मी मात्र संध्याकाळची वाट पाहत मस्त पैकी ताणून देण्यासाठी माझ्या गेस्टरूम मध्ये परतलो.


लोक बिरादरी
प्रकल्प
३ डिसें. १९७३ । हेमलकसा



# शिक्षणाची साधना

"Give Them Chance, Not Charity"- बाबा आमटे.

बाबा आमटेंनी  आदिवासींच्या आरोग्यासाठी, त्यांच्या सर्वांगीण भल्यासाठी प्रकाश सरांच्या मदतीने हेमलकसाला लोकबिरादरी प्रकल्प सुरू केला. आज बाबा आमटेंची तिसरी पिढी हे कार्य त्याच जबरदस्त इच्छा शक्तीने पुढं नेटाने चालवत आहे.

स्वातंत्र्यानंतर आज 2020 मध्ये आदिवासी बांधवांसाठी परिस्थिती फारशी बदलली आहे का? एकाक्षरी उत्तर देणं कठीण आहे. लोकबिरादरी स्थापन झाल्यावर सरकार दरबारी थोडी फार हालचाल होऊन बदल घडवून आणण्यासाठी काही प्रयत्न जरूर झाले आहेत, पण ते पुरेसे नसावेत. कारण आज आदिवासींच्या कडे मोबाईल आहे, पण वीज पोहोचली नाही. दुचाकी गाडी आहे, पण रस्तेच नाहीत. बाजारात अन्नधान्य उपलब्ध आहे, पण कुपोषण संपलेलं नाही. गावोगावी सरकारी शाळा आहेत, पण त्यातलं शिक्षण आदिवासी मुलांपर्यंत पोहोचलं नाही.  75,76 साली लोकबिरादरीने आदिवासी साठी आश्रमशाळा सुरू केली. आजघडीला तिथे 650 मुलं 12वि पर्यन्त शिक्षण घेत आहेत. पण

तुलनेत ही संख्या कमी आहे. आजही कित्येक आदिवासी मुलं शिक्षण घेत नाहीत. ह्याची कारणे अनेक आहेत. त्यातलं महत्वाचं कारण म्हणजे दुर्गमता. महाराष्ट्रातल्या इतरत्र असलेल्या खेड्यांची तुलना तुम्ही इथल्या भागाशी करत असाल, तर तुम्ही चूक करताय अस मी म्हणेन. मी देखील ही चूक केली होती. इथे किर्रर्र जंगल आहे. रस्ते नाहीतच. वीज नाही. पिण्याचं पाणी नाही. असंख्य नाले आहेत, ज्यामुळे एखाददुसऱ्या जोरदार पावसाने आधीच दूरदूर वसलेली गावं पायी चालत जाण्यासाठीही सोयीची राहत नाही. त्यात जंगली प्राण्यांचं भय.

अशातंच हेमलकसा पासून साधारणतः 25 किलोमीटर अंतरावर असलेल्या नेलगुंडा आणि आसपासच्या गावचे लोकं लोकबिरादरी मध्ये आले, एक शाळा सुरू करण्याचा आग्रह घेऊन. लोकबिरादरीची आश्रम शाळा त्यांच्यासाठी उपयुक्त नव्हती, कारण एकतर शाळेची पटसंख्या आधीच भरपूर होती, ज्यामुळे ॲडमिशन साठी परवानगी नव्हती. आणि दररोजच 25+25 किमी प्रवास करणं मुलांसाठी शक्यच नव्हतं. मग उपाय म्हणून नेलगुंडयालाच एक शाळा सुरू करावी असं ठरलं. अर्थात ह्यात अनंत अडचणी होत्या. इतक्या दुर्गम भागात शिक्षक मिळणं, शाळा बांधणं, उत्तमंच शिक्षण देण्यासाठी सोयीसुविधा पुरवणं, रस्तेच

नसताना तिथं जाणं-येणं करणं.. तशातच हा भाग अतिसंवेदनशील म्हणून ओळखला जातो. अशा अनेक न सांगता येणाऱ्या अडचणी! अडचणींचा तो डोंगर फोडुन शाळा सुरू केली आमटेंच्या तिसऱ्या पिढीने.. श्री.अनिकेत आमटे आणि समीक्षा गोडसे-आमटे ह्यांनी. 2015 साली  नेलगुंडयाला पाचवीपर्यंतची इंग्लिश शाळा सुरू झाली. इथल्या माडिया-गोंड आदिवासींच्या साठी मराठी ही 'विदेशी' भाषाच. म्हणून मग इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा श्रीगणेशा केला.

संध्याकाळ पर्यंत झोप काढून मी अनिकेत सर आणि समीक्षा ताईला भेटलो. त्यांनी मला लोकबिरादरी मध्ये यायचं कारण विचारलं, विचारपूस केली. मी मानव संसाधन  क्षेत्रात काम केलं असल्याने मला माणसाचे स्वभाव थोडेफार कळतात. गेल्या दोन दिवसात मी जवळपास सर्वच आमटे कुटुंबियांना भेटलो होतो. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर, नजरेत  मला प्रत्येक वेळी आपुलकी दिसलीयं. कुठल्याही प्रकारचा बडेजाव नाही, किंवा अहंकाराचा वारा स्पर्श झालेला नाही. जमिनीशी नाळ घट्ट बांधून ठेवलीये ह्या सर्वांनी.

हे मी सांगण्यापेक्षा प्रत्येकाने अनुभवावं.

अनिकेत सर आणि समीक्षा ताईशी बोलून माझं काम ठरलं.. दुसऱ्या दिवशीपासून मी नेलगुंडयाच्या शाळेत जाणार होतो.. शिक्षक म्हणून. एक नवा मार्ग मला समोर होता.. आणि प्रवास जंगलातून होता.



# साधना विद्यालय, नेलगुंडा

साधना विद्यालय, नेलगुंडा हे 2015 साली स्थापन झालं. ह्याची विशेष गोष्ट म्हणजे, ही शाळा लोकांनी पुढाकार घेतल्यामुळे सुरू करण्यात आली. शाळेत आजूबाजुच्या गावातली मुलं येतात. आजूबाजूच्या म्हणजे 5,6 किलोमीटर परिसरातील. सकाळी लवकर उठून 8 वाजता हजर राहतात. यायला रस्ता अर्थातच नाही. वाट आहे ती घनदाट जंगलातली. काही वेळा 'एडजू' म्हणजे अस्वल दिसल्याच्या घटनाही घडतात. मग ही लहानगी एकत्र येतात.. अर्थात सर्वात लहानगा असतो 5 वर्षांचा अन मोठा असतो 12 वर्षांचा. आणि हा घोळकाही  कधी कधी 2,3  मुलांचाच असतो. आईबाप सकाळपासून कामात गुंतल्यामुळे एकट्यानेच मार्ग काढतात.

माझा पहिलाच दिवस होता. समीक्षा ताईने सकाळी 6:30 ला तयार रहायला सांगितलं होतं. दोन कार्यकर्ते प्रकल्पातून दररोज शाळेत जाऊन-येऊन असतात. त्यांच्याबरोबर मला जायचं होतं. नेलगुंडा प्रकल्पपासून साधारणतः 25 km दूर आहे. जाणं शक्य आहे ते दणकट टू व्हीलर वर किंवा 4 व्हील ड्राइव्ह असणाऱ्या कारमधून.. कारण जंगलातील खडकाळ, निसरडे, मधूनच फांद्या

तुटून पडलेल्या रस्त्यावर इतर कोणत्याही प्रकारची गाडी चालवत नेणं शक्य नाही. सध्या शाळेत 130+ विद्यार्थी आहेत. त्यांना दररोज नाश्ता अन जेवण दिलं जातं. ह्यासाठी लागणार सामान, जसं की भाज्या, तांदूळ, दूध ,अंडी, पोळ्या, भात इत्यादी आणि नेहमीच शैक्षणिक साहित्य सगळं प्रकल्पातून न्यावं लागतं. शाळेच्या आजूबाजूला असणाऱ्या गावात, खरं तर जंगलात हे कुठून उपलब्ध असणार? माझा पहिला दिवस होता सोमवार. दणकट इसुझु कार मधून दोन्ही कार्यकर्त्यांनी सगळं सामान भरलं. त्याआधी ताईने दोघांची ओळख करून दिली, मकरंद दातार, जो अमेरिकेतून भारतात परतला होता अन 1 महिन्यासाठी शाळा-शिक्षक म्हणून काम करणार होता. दुसरा होता, यतिश जाधव. हा मूळचा मुंबईतला, पण अनेक वर्षांपासून प्रकल्पाशी संबधीत. पावणे सातच्या सुमारास आम्ही प्रकल्प सोडला अन निघालो नेलगुंडयाला.

प्रकल्पपासून 3 किमीवर भामरागड हे तालुक्याचं ठिकाण आहे. प्रकल्पपासून तिथे जाईपर्यंत डांबरी रस्ता आहे.आजूबाजूला मागच्या वर्षी येऊन गेलेल्या पुराच्या खुणा दिसत होत्या. म्हणजे रस्ता उखडलेला होता, पाण्याबरोबर वाहत आलेली झाडं झुडपं होती. भामरागडच्या सुरवातीलाच पर्लकोटा नदी वाहते. हीने

मागल्या पुरात रौद्ररूप धारण करून बाजारपेठ अन घरं कवेत घेतली होती. माणसांनी पुन्हा एकदा नव्या जोमाने सगळं सुरवात केलं होतं. नदी ओलांडून आम्ही भामरागडच्या बाजारात प्रवेश केला.

एक सांगायचं राहिलंच. भामरागडच्या जरा अलीकडे आम्हाला तीन सूर्याचं दर्शन झालं.. होय, तीन. एक तो नभी उगवणारा सूर्यनारायण, अन जमिनीवर असलेले 'प्रकाश सर आणि मंदा ताई' हे दोन सूर्य. सकाळचा नदीवरचा  नेहमीचा फेरफटका मारून दोघेही परतत होते. आम्ही कारची स्पीड कमी करून त्यांना अभिवादन केलं. त्या दिवसापासून माझा तो दररोजचा शिरस्ताच पडला. नेलगुंड्याला जाताना दोघांचंही दर्शन व्हायचं अन दिवसाला उत्साहात सुरवात व्हायची.

तर, भामरागड पार करून आमची कार शाळेकडे निघाली. मध्ये आम्हाला मेडपल्ली नावाचं गाव लागलं. तिथे आमच्या शाळेतले एक शिक्षक, रिकेश दादा राहतात, त्यांना सोबत घेतलं. आमची ओळख झाली. मेडपल्ली जवळून पामुलगौतमी नदी वाहते. 15 मिनिटांच्या प्रवासात नजरेस पडलेली ही दुसरी नदी. साधारणतः दोन किमी गेल्यावर कार उजवीकडे वळली. इथपर्यंत चांगला डांबरी रस्ता होता. इथून कच्च्या रस्त्यावर गाडी न्यावी

लागत होती, म्हणजेच जंगलातील रस्त्यावर. मोबाईल नेटवर्क इथे साथ सोडून देतं, ते परत येताना ५ वाजताच मिळतं.

मी सरसावून बसलो. झाडांची घनता वाढत होती. जसजसे आम्ही पुढे जात राहिलो, तसतसं जंगल दाट होत चाललं होतं. कुठल्याही प्रकारचा आवाज नव्हता. 4 व्हीलर जाईल, इतकीच गाडीवाट होती. औरंगाबाद जवळच्या असलेल्या हिरवळीला, झाडांना निसर्ग समजणारा मी, इथं प्रत्यक्षात त्याच्या अंगणात होतो. खरं, निबीड जंगल आणि शहराभोवतालची झाडी, ह्यात जमीन अस्मानाचा फरक असतो, हे मला जाणवलं. जंगलात निसर्ग राजा असतो. तो आपला रुतबा, आब राखून असतो. जंगलाला स्वतःच असं व्यक्तिमत्त्व असतं. फक्त आणि फक्त झाडं, पक्ष्यांचे आवाज अन पंखांची फडफड ह्या व्यतिरिक्त सर्वत्र शांतता असते. काही ठिकाणी तर सूर्यप्रकाश ही पोहचत नाही, इतकी झाडा-झुडपांची गर्दी असते. पेनगुंडा फाटा म्हणून फक्त 2 व्हीलर जाईल अशी पायवाट आहे. तिथून आम्ही पुढे



कैकवेळा गेलो. तिथलं जंगल तर अधिकच काळोखं. जंगल तुम्हाला भिववतं, तुम्ही एकटे असल्याची जाणीव करून देतं अन त्याचवेळी आजूबाजूला कोणीतरी असल्याची चाहूल ही करून देतं. मध्येच कुठेतरी आजूबाजूंच्या गावातील आदिवासींनी बांधलेली कमानी दिसत होत्या. त्यावर ते 'पडूंम' म्हणजे सणावाराला एखादा प्राणी मारून लटकवतात, असं समजलं. एका ठिकाणी एक खार मारून लटकवली होती.मध्येच कुठेतरी आदिवासींच्या कबरी दिसायच्या, ज्यावर विशिष्ट प्रकारचं चिन्ह किंवा आकृतीचं बांधकाम केलेलं असायचं.

अशा जंगलातून वाट काढून मला दररोज शाळेत यायचं होतं. जंगलाशी मैत्री असावी , ह्याची गरज वाटली. मध्ये घोटपडी नावाचं गाव ही लागलं. इथे प्रकल्पाने एक हेल्थ सेंटर सुरू केलंय, जिथे मलेरिया, ताप सर्दी, जुजबी जखमा , ह्यासारख्या आजारावर इलाज केला जातो. सोबतीची मंडळी माहिती पुरवत होते. शाळा जवळ येत चालली. नेलगुंडा समोर होतं. गावाच्या वेशीवर भलंमोठं कुंपण घातलेलं होतं. त्याचं दार उघडून आम्ही गावात गेलो. समोरच एक वास्तू दिसली. अर्थातच ती आमची शाळा होती..माझी शाळा होती.

ती पाहूनच प्रेमात पडण्याचं एक कारण मला मिळालं.





## ‘दादा !!!”

खरं सांगायचं तर, 'आदिवासींची दुर्गम भागातील शाळा' म्हटल्यावर माझ्या डोळ्यासमोर आलं होतं की, एखादी रंग उडालेली जुनाट इमारत असेल, बसायला- शिकायला फारशा सोयी सुविधा नसतील .. पण लांबूनच शाळेचं  झालेल् दर्शन मला चुकीचं ठरवत होतं. मी बघता क्षणी शाळेच्या प्रेमात पडलो. गावात प्रवेश करतानाच समोरचं षटकोनी आकाराचे वर्ग दिसत होते. नोव्हेंबर असल्याने धुक्याची चादर लपेटून वर्ग उभे होते.. आणि त्या धुक्यात होती बागडणारी, खेळणारी, हसणारी मुलं..

ह्या शाळेतली मुलं म्हणजे एक स्वतंत्र विषय आहे. त्याबद्दल काही आठवणी नक्कीच सांगणार आहे.

आम्ही वळसा घालून शाळेच्या समोर आलो. शाळा दोन भागात वाटली गेलीये. मधून गावचा रस्ता जातो, तो थेट इंद्रावती नदीकडे.

डाव्या बाजूचं गेट उघडून आम्ही कार आत टाकली. सर्व शिक्षक आले होते.. आमची ओळखीपाळखीचा सोपस्कार पार पडला. इथले सर्व शिक्षक स्थानिक भागातले आदिवासी बांधव

आहेत. आतापर्यंत मुलं माझ्याभोवती जमा झाली होती. बालसुलभ कुतूहलाने टकामका बघत होती. इतर शिक्षकांना, 'मी कोण'? म्हणून विचारत होती. तोपर्यंत गाडीतील सामान काढून ठेवण्यात आलं होतं. डाव्या बाजूला एक झोपडीवजा खोली होती.ते म्हणजे शाळेचं किचन.. चूल असलेलं.. सकाळच्या नाश्त्याची तयारी चालू होती. मी उभा होतो, त्यासमोर एक सिमेंटची पडवी होती, जिथं दुपारचं जेवण व्हायचं. तिथं आत मध्ये अजून दोन खोल्या होत्या. एकीत शाळेचं साहित्य तर दुसरी कधी रहावं लागलंच तर उपयोगी पडणारी.

एका भिंतीवर मोठ्या अक्षरात लिहिलं होतं..'चुकते कई बातल आयो'. मी रिकेश दादांना अर्थ विचारला. माडिया भाषेतल्या त्या वाक्याचा अर्थ होता, 'चुकलं तरी काही होतं नाही.'



एव्हाना मुलं येऊन बिलगली होती. ‘ओळख’ वगैरे कृत्रिमतेची गरज त्यांना नव्हती. इवली इवली पोरं, ' Dada

what is your name?' विचारत होती. मी सांगितलं. कुणा धटूकल्याने, 'Dada tell your full name!' म्हणून माझी विकेट घेतली होती. मग माझ्या गावाचं नाव, ते कुठे आहे? भामरागडच्या जवळ आहे की दूर? भाऊ बहिणी किती? भावाचं, आईच नाव काय? सगळं सगळं विचारून घेतलं. माझा हात धरून आमचा हा लवाजमा चालला होता. आम्ही रस्त्याच्या उजव्या बाजूला असलेल्या शाळेच्या आवारात आलो. भलंमोठं ग्राउंड होतं. तिथं अनेक झाडं होती.. काहीजण 'टेमरु' ची फळं गोळा करत होती, आनंदाने पळपळीचा खेळ खेळत होती. डाव्या बाजूला बालवाडीचा वर्ग होता. नेलगुंड्यातच राहणाऱ्या शिल्पा ताई ह्या त्याच्या वर्गशिक्षिका. थोडं पुढे गेल्यावर तीन षटकोनी, लाल रंगात रंगवलेले वर्ग होते. बाहेर आकाशकंदील लटकत होते..अजूनही धुकं होतंच. मुलं मला ओढत नेऊन एका वर्गात घेऊन गेली, असेंम्बली साठी. दोघातिघांनी मला हक्काने त्यांच्याजवळ बसवून घेतलं. दररोज वेगवेगळी मुलं प्रार्थना म्हणायची, स्थानिक बातम्या सांगायची, काल का गैरहजर होतो, हे ही सांगायची. ह्यानंतर ग्राऊंडवर व्यायामाचा तास व्हायचा. आधीच 2,4 किलोमीटर चालून आलेली मुलं, परत शाळा सुरू होईपर्यंत खेळलेली मुलं अजिबातच दमलेली नव्हती. आदिवासी मुळातच काटक. श्रमाला मागे न हटणारा. मी पहिलाच दिवस असल्याने त्यांचा व्यायाम

बघत होतो. तेवढ्यात कुणीतरी ,'Dada, you also do this exercise.' म्हणून सूर्यनमस्कार करवून घेतला.

समीक्षा ताईंनी मला सुरवातीचे काही दिवस तिसरीच्या वर्गात बसायला सांगितलं होतं.म्हणजे शिकवायचं वगैरे नव्हतं, तर फक्त समजनू घेण्यासाठी. रिकेश दादा तिसरीचे शिक्षक.

साधारणतः 10 दिवस मी तिसरीच्या आणि नंतर चौथीच्या वर्गात घालवले. एक दिवस पाचवीच्या वर्गात. सुनिल दादा चौथीचे वर्गशिक्षक तर मकरंद दादा पाचवीला शिकवत होते. मकरंद दादांचा एक महिना संपत आला होता. त्यानंतर मी पाचवीचा वर्ग शिक्षक असणार होतो.

सुरवातीला मी वर्ग पाहून शाळेच्या प्रेमात पडलो. दुसरं कारण होतं ते म्हणजे इथली मुलं. फक्त आणि फक्त प्रेमळ! आणि तिसरं कारण म्हणजे मी मुलांचा 'सर, मास्तर, गुरुजी' नव्हतो, तर "दादा" होतो. जे आहे एक जबाबदारीचं पद.. आणि मुलांच्या हक्काचं स्थान!





## What re, Dada?

नेलगुंड्याच्या शाळेतली मुलं एक स्वतंत्र विषय आहे. अगदी एखादं पुस्तक निघावं इतकं 'बालपण' त्यांच्यात आहे.

मी औरंगाबादचा. जेव्हा मुलांना मी कुठून आलोय, हे सांगितलं, तेव्हा त्यांनी पटकन जाऊन नकाशात औरंगाबाद शोधलं. तिथून ते नेलगुंडा अंतर किती आहे, यायचं-जायचं कसं? हे सगळं सगळं विचारलं. इथली मुलं भामरागडच्या पुढे कधी गेलेली नाहीत. रेल्वे फक्त पुस्तकात वाचूनच माहीत.

पण गंमत म्हणजे , मी नेलगुंडा किंवा आजूबाजूच्या गावातील नाही, म्हणजे मला एकंदरीतच फार कमी माहिती आहे, असा समज मुलांनी करून घेतला. सगळं शहाणपण आपल्या गावातच आहे, ह्यावर सर्वजण अगदी ठाम होते. त्यामुळे गावाबाहेरच्या ह्या दादाला फारसं काही माहीत नाही, म्हणून आपणच त्याला 'शहाणं' करून सोडावं, ह्यावर त्यांचं एकमत झालं होतं.

सुरवातीला काही दिवस मी तिसरीच्या वर्गात बसत होतो. रिकेश दादा शिकवायचे, अन मी बाजूला बसून समजून घ्यायचो. आधी रिकेश दादाच्या बाजूला बसणारा मी, हळूहळू मुलांच्या मधे

जाऊन बसू लागलो. खरंतर मुलांतच भांडण व्हायची की मी कुणाजवळ बसावं? ह्यावरून. (रिकेश दादाचं शिकवण ह्या सगळ्या डिस्टर्ब व्हायचं, खरं तर.) मुलं मग माझी वाटणी करायची, म्हणजे ह्या विषयासाठी इथं, तर त्या विषयासाठी तिथं बसायचं, अशी.

काही दिवसांनी मग चौथी अन पाचवीचे मुलं, मी त्यांच्या वर्गात यावं, असं सुचवू लागली. पण मला तिसरीत ट्रेनिंग साठी बसायला सांगितल्यामुळे तिकडे जाता येत नव्हतं. मुलांना हे सांगणं, समजावणं शक्य नव्हतं. मग ती मुलं, मी का येत नाहीये, त्यांच्या खास शैलीत "What re ,dada?" म्हणून लटकं रागावू लागली. मग ही कसर नाश्त्याच्या अन जेवणाच्यावेळी भरून काढण्यात आली. मलाही हवं असायचं सगळ्यांबरोबर असणं. पुढे 15 दिवसांनी मी पाचवीच्या वर्गावर रीतसर शिक्षक म्हणून जाऊ लागलो. पण त्यामुळे झालं असं की, तिसरीच्या मुलांनी माझ्यावर नाराजी दाखवायला सुरवात केली. म्हणजे ," you are our dada, don't go there" असं.. मग त्यांची समजूत काढणं, कधी कधी एखाद-दुसरं लेक्चर घेणं, असं काहीसं करावं लागलं. पण त्यातल्या, 'रिद्धी, आरती, अन पूर्वाक्षी' ह्या तीन अंबाबाई मात्र गाल

फुगवून बसायच्या. त्यांना असं 'टेम्परारी' येणं पसंत नव्हतं. खरंतर ह्या माझ्या खास मैत्रिणी होत्या, पण त्यांनी मग अबोला धरला. त्यातल्या रिद्धी अन आरती नंतर थोड्या मावळल्या.. पण पूर्वाक्षी मात्र अजूनही गाल फुगवून बसलेली आहे.. फुल 'टशन' मध्ये आम्ही एकमेकांशी भांडतो, चिडवतो. मध्येच ती आपण रुसलोय हे विसरून बोलायला लागते.. मग मीच तिचा कुठलातरी 'दात पडका' फोटो दाखवतो, अन परत आमचं लुटुपुटूचं भांडण सुरू होतं.



सुरवातीला माझी फार फजिती व्हायची. कारण सर्वच मुलामुलींचे केस अगदी बारीक कापलेले असायचे. त्यामुळे मुलगा कोण अन मुलगी कोण? हे ओळखण्यात मी हमखास गोंधळ घालायचो. त्यात माडिया येत नसल्याने अधिकच भर पडायची. कुणी मुद्दाम चुकीचा शब्द सांगून गंमत पहायचे. खरं तर , बऱ्याचदा मला ते माहीत असायचं, पण मुलांच्या निर्हेतुक गमतीसाठी, त्यांच्या खळखळून हसण्यासाठी मी ही 'अज्ञान' पांघरून बसायचो.

असंच एकदा पाचवीच्या वर्गाबाहेर 'सडा' टाकायचं मुलांनी ठरवलं. मला आधी सडा म्हणजे माडिया शब्द वाटलेला. कारण ते बोलताना 'नापी' (शेण!) आणायला हवी असं काही बोलत होते. मी 'सडा' विचारल्यावर त्यांनी एकमेकांकडे पाहिलं. मला काहीच माहिती नाही, ह्यावर त्यांनी शिक्कामोर्तब केलं. औरंगाबादच्या दादाला हे कुठून माहीत असणार? असं वाटून मला शहाणं करण्यासाठी त्यांनी 'You don't know, dada' म्हणून सडा म्हणजे काय? शेणाने कसं सारवायचं? रांगोळी म्हणजे काय? अशी इत्यंभूत माहिती पुरवली. मी ही अगदी पहिल्यांदाच ऐकतोय,असा चेहरा करून ऐकुन घेतलं. सगळयांच्या चेहऱ्यावर कृतकृत्य

झाल्याचं समाधान पसरलं.( मी मुद्दाम  मुलांना मला माहित असल्याचं सांगितलं नव्हतं, कारण मला मुलांची 'एज्युकेशनल पर्सनॅलिटी' तयार करायची होती. त्याबद्दल नंतर कधीतरी.)



# “You don't understand, Dada''

असाच एक अविस्मरणीयएक प्रसंग दुपारच्या जेवणाच्या वेळी घडला होता.

दुपारी आम्ही सर्व शिक्षक आणि विद्यार्थी एकत्रच जेवायला जमतो. सिमेंट- फरशीची एक मोठी ओसरी आहे, तिथे एक वाजता आम्ही सर्वजण रांगेत बसतो. कधी उशीर झाला तर मग बसायला जागा मिळत नाही, म्हणून पोरं आधीच माझी जागा पकडून ठेवतात. एकाचवेळी अनेक जणांनी जागा पकडल्यामूळे कुठे जाऊन बसावं? हा मोठाच गहन प्रश्न माझ्यासमोर असतो. एकतर मी जिथे बसतो, तिथली आजूबाजूची शांतता फारशी टिकून रहात नाही. कारण मी मुलांच्या खोड्या काढतो. म्हणजे कुणाची प्लेट लपव, कुणाला हळूच गुदगुल्या कर, एखाद्याच्या ताटातली अंडी पळव, कुणी माझी पाण्याची बाटली लपवून ठेव, असले उद्योग सुरू असतात. किंवा मग कुणी जेवण नीट करत नसेल तर त्याच्याशी ,'कोण जास्त पोळ्या खाणार?' अशी स्पर्धा लाव. मग तो विद्यार्थी आपसूकच पोटभर जेवतो. परत मुलांना मी गणितं-पाढे विचारतो.

मग त्याचं उत्तर देण्यासाठी सगळ्याच रांगेमधली मुलं गडबड करतात. कधी कधी बाकीचे शिक्षक ओरडतात, पण त्यांनाही ते सगळं आवडतं. मग आम्ही चारदोन मिनिटं शांत बसून परत गोंधळ घालायला मोकळे.

असंच एकदा मी जेवायला बसताना जमिनीवर ताट तिरपं झाल्याने भाजी सांडली. मुलांनी मला चिडवायला सुरवात केली, मी ही इतरांना, 'मी नाही, त्यानेच सांडली' वगैरे सांगून चिडवत होतो. आमचं जेवण संपत आलं. माझ्या आजूबाजूला दोन तीन वर्गाची लहानमोठी मुलं होती. त्यातील एकीने तिच्या बाजूच्याला कानात काहीतरी सांगितलं. माझ्या रांगेतल्या बाजूच्यानंही माडिया मध्ये काहीतरी सांगितलं. मी काय चाललंय, म्हणून विचारलं तर, "Dont tell him" म्हणूनही लहानग्यांना सांगितलं. त्या सर्वांचं जेवण झालं होतं, पण नेहमीप्रमाणे कुणीही ताट किंवा हात धुवायला गेलं नाही. माझं ही जेवण झालं अन मी सांडलेली भाजी उचलून ताटात टाकणार, तेवढ्यात माझ्या बाजूच्या दोघा मुलांनी माझे हात धरले.एकजण कुठेतरी पळाला. एकाने ताट उचललं. मी काय करताय म्हणून विचारलं, पण उत्तर मिळालं नाही. तेवढ्यात एकजण एक फडकं आणि पाणी घेऊन आली. तिने समोरची भाजी उचलली, पाणी टाकून फरशी पुसली, अन मगच मला सोडलं. मी

अर्थातच रागावलो. त्यांनी साफ केल्याचं मला आवडलं नसल्याचं मी त्यांना सांगितलं, कारण भाजी माझ्याकडून सांडली होती.

मुलांनी मला नेहमीप्रमाणे "you don't understand, Dada" म्हणून घेतलं.

मी हा प्रसंग नंतर एकाला सांगितला. त्यावर तो म्हणाला, 'सरांच्या नजरेत इमेज चांगली व्हावी म्हणून केलं त्यांनी.. आम्ही पण असं पुढे-पुढे करायचो.' मी त्याचं ऐकून शांत बसलो, अन स्वतःशीच हसलो.

मी रागावल्यानंतर मुलं मला काय म्हणाली होती, ते मी त्याला सांगितलंच नाही.



भाजी उचलल्यावर मुलांनी मला "दादा, तुला समजत नाही" म्हटलं. मी ही, जरासं रागावून "काय समजत नाही मला? ह्यापुढे तुम्ही असं केलेलं मला आवडणार नाही' म्हटलं.

त्यावर मुलं मला म्हणाली, "दादा, आमच्या घरी जर कोणा मोठया माणसाकडून काही सांडलं तर आम्ही असंच करतो. त्यांना उचलू देत नाही, आम्हीच साफ करतो." असं म्हणून मुलं त्यांची ताटं धुवायला पळाली. मी मात्र स्तब्ध बसून होतो. माझी ही मुलं मला त्यांच्यातला एक समजत होती, नुसता एकजण नाही तर, घरातला मोठा मानत होती. मला त्यांनी त्यांच्यात सामावून घेतलं होतं, त्यांच्या घरातला समजलं होतं.

त्याक्षणी, 'ह्या मुलांकडून मला खूप काही शिकायचं आहे' ह्याची जाणीव झाली.

आणि स्वतःलाच ,"You don't understand anything, Dada" म्हणत मी भरल्या मनाने उठलो.


Paraynar
Mahakapadi
Midadapalli
Kavande
Bhatpar
Nelgunda

# एज्युकेशनल पर्सनॅलिटी # १

रूढार्थाने मी शिक्षक नाही. कारण माझ्याकडे BEd, DEd ची डिग्री नाही. मी ह्यूमन रिसोर्स क्षेत्रात काम केलं आहे, ज्यात ट्रेनिंग द्यायचं अन मनुष्यबळ विकसित करण्याचं माझं काम होतं.

जेव्हा मला कळलं मी मला शिकवायचं आहे, तेव्हा सुरवातीला मी जरा साशंक होतो. कारण 'टिचिंग' आणि 'ट्रेनिंग' ह्यात काही मूलभूत फरक आहे. ट्रेनिंग मध्ये समोरच्याला आधीचं काही ज्ञान असतं, किमान बेसिक तरी झालेलं असतं. पण शिक्षणात शून्यापासून श्रीगणेशा करावा लागतो, मग तो कुठलाही वर्ग असो. त्यात मला ही भीती होती की, मुलं मला स्वीकारतील का ह्याची? कारण आपण मोठी माणसं, समोरचा आवडला जरी नाही तरी, 'ॲडजस्ट' करतो. पण लहान मुलांच्या बाबतीत तसं नसतं. बोटचेपेपणा न करता मुलं सरळ 'हो किंवा नाही' ठरवून मोकळी होतात. मला जर मुलांनी स्वीकारलं नाही तर? मला शिकवता नाही आलं तर? ही भीती वाटत राहायची. पण आधी जसं सांगितलं, तसं पहिल्याच तासात मुलांनी माझा ताबा घेतला, अन मला हायसं वाटलं. मला स्वीकारलं जाईल का ही मनातली शंका पहिल्या 10 दिवसातच दूर झाली. आता प्रश्न उरला तो, मला

शिकवायला जमेल का? कारण प्रश्न माझा नव्हता, तर मुलांच्या भवितव्याचा होता, पुढच्या संपुर्ण आयुष्याचा होता. जर माझ्याकडून काही , नकळतपणे का होईना, चुकीचे संस्कार झाले, तर त्याचे परिणाम मुलांवर होणार होते. मी दोन तीन दिवस नीट विचार केला. मनाशी काही ध्येयं ठरवली. जसं मी कंपनीत ट्रेनिंग देऊन लोकांना विकसित करत होतो, त्याचप्रमाणे मुलांची 'एज्युकेशनल पर्सनॅलिटी' तयार करायचं नक्की केलं. अर्थात माझी नेहमीची पद्धत इथे उपयोगी पडणार नव्हती, म्हणून त्यात थोडे बदल केले. ज्ञान फक्त 'पुस्तकी' पद्धतीने देण्याच्या मी आधीपासूनच विरोधात आहे, मग भले ते ज्ञान पुस्तकातलं का असेना!

ह्या वयातील मुलांना काय हवं, ह्याची यादी मी केली.

खरं पाहायला गेलं तर, साधना विद्यालयात मुलांच्या बाबतीत फारच सुंदर गोष्टी केल्या आहेत. जसं की प्रत्येक वर्गात स्वतंत्र पुस्तकालय आहे. नाश्ता अन जेवणाच्या बाबतीत सकस आहार दिला जाईल ह्याकडे समीक्षा ताईचं अगदी काटेकोर लक्ष असतं. जेवणाचा मेनू लिहूनच ठेवलेला असतो. मग वैयक्तिक स्वच्छता आहे की नाही, हे ही पाहिलं जातं. एक सांगायचं म्हणजे, जेव्हा लॉक डाऊन सुरू झालं, तेव्हा साधारणतः एका महिन्याने मी

मुलांना भेटलो. मुलं ओळखू येत नव्हती, इतकी बदलली होती. म्हणजे अस्ताव्यस्त कपडे, मळकट शरीर, केस न विंचरलेले.. हीच मुलं शाळेत असताना नीट आंघोळ करून, केस विंचरलेले, नखं कापलेली, स्वच्छ आणि नीटनेटकी अशा स्वरूपात असायची. म्हणजे शाळा बंद असल्याचा परिणाम होत तो. ह्याचाच दुसरा अर्थ, आमची शाळा त्यांच्या जीवनात आमूलाग्र पण चांगला बदल घडवून आणत होती. आदिवासींच्या मुलांसाठी शाळा नेटाने चालवणं किती गरजेचं आहे, हे अधोरेखित झालं होतं.

शाळेने मुलांना चप्पल, ड्रेस, स्वेटर आणि सायकली दिल्या आहेत. इथे चप्पल घालायची सवय कुणालाच नाही. त्यामुळे आदिवासींच्या पायात अन आपल्या सारख्या चप्पल घालणाऱ्यांच्या पायात एक सूक्ष्मसा फरक मला आढळला. चप्पल किंवा बुटामुळे आपल्या पायाचे पंजे अन बोटं बांधीव म्हणा किंवा जवळजवळ असतात. पण आदिवासींचे पाय अन बोटं पसरट झालेली असतात, कारण सतत चालणं.

मुलांना इथं उत्तमोत्तम पुस्तकं, मग ती इंग्रजी असो वा मराठी, उपलब्ध आहेत. प्रोजेक्टर रूम आहे, ज्यात मुलं शैक्षणिक व्हिडीओ, पिक्चर पाहतात. शहरी मुलांना पिक्चर मधले हिरो,हिरोईन सर्रास माहीत असतात, पण इथे फारच कमी प्रमाणात

हिरो-हिरोईन बद्दल मुलांना माहीत आहे. आश्रमशाळा अन साधना विद्यालय, दोन्हीकडे मुलांच्या खेळण्यासाठी भलं मोठं ग्राउंड आहे. वेगवेगळे खेळ आहेत, साहित्य सुविधा आहेत. कबड्डी अन व्हॉलीबॉल हे आदिवासींचे आवडते खेळ. क्रिकेट ही लोकप्रिय आहे. नेलगुंड्याला तर साक्षात सचिन तेंडुलकर ने भेट दिलेला क्रिकेटसंच आहे! इथं मूला-मुलीत भेदभाव होत नाही. असा भेदभाव असतो, हीच कल्पना मुळात आदिवासींच्या जीवनात नाही. (आमच्या शाळेत तर मुलीच 'डॉमीनेटिंग' आहेत ! )

धडपडणं, जखमा होणं ही मुलांसाठी नित्याचीच बाब आहे. कबड्डीत जमिनीवर एकमेकांना धरून आदळणं, हा तर सहजभाव आहे. सुरवातीला मी ,'अरे भांडू नका रे, मारामारी करू नका रे' म्हणून ओरडायचो. पण नंतर समजलं, ते त्यांचं दररोजचं आहे. ही मुलं इतकी काटक आहेत की, त्यांना लागतच नाही. इथं 'निर्मिती' चा एक विशेष वर्ग आहे. सपना ताई तो घेतात. ह्यात मुलांना क्राफ्ट, पेपर वर्क, ड्रॉईंग,



माती-काम शिकवलं जातं. शाळेचं स्वतःच शेत आहे. जिथं मुलं आणि 'जोरू दादा, लालसू दादा, देवाजी दादा अन पाली ताई' ह्या स्टाफ मिळून काही भाज्या अन धान्य पिकवतात. जे आम्हाला दररोजच्या जेवणात उपयोगी पडतं. शाळेत फळझाडांची संख्या ही भरपूर आहे. ही फळं तसंच स्थानिक गावकऱ्यांकडून विकत घेतलेली फळं मुलांना दररोज शाळा सुटताना खायला दिली जातात.

त्याचप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी शाळेची मुलं "जिल्ली पेक्का" हा कार्यक्रम हाती घेतात. ह्याचा अर्थ आहे "प्लास्टिक गोळा करणे". संपूर्ण शाळेची मुलं सकाळी असेम्ब्ली झाल्यावर सगळं नेलगुंडा गाव पालथा घालून छोटे-मोठे प्लास्टिक पिशव्या, प्लस्तिक्चे तुकडे गोळा करतात अन गाव प्लास्टिक मुक्त करतात. किमान नेलगुंडा गावाचं पर्यावरण सुरक्षित ठेवतात.

अशा परिपूर्ण शाळेत मी काय करणार होतो, ते पाहायला माझा मीच उत्सूक होतो.





# एज्युकेशनल पर्सनॅलिटी # २

मी मुलांचं नीट अवलोकन केलं. मी ह्यापूर्वी इंजिनियर्स साठी काही करिक्युलम डिझाइन केलेलं आहे. त्याचा इथे उपयोग झाला. मला जाणवलं की, आदिवासी बांधव काही विशिष्ट परिस्थितीत मागे पडतात किंवा इतर समाजाशी असलेलं त्यांचं नातं, त्यांच्या जीवनशैली मुळे तितकं घट्ट होऊ शकत नाही. इथे शहरी जीवनशैली योग्य अन आदिवासींची अयोग्य असं मला म्हणायचं नाहीये. फक्त काही 'वैश्विक तथ्य' म्हणून ज्या गोष्टी ओळखल्या जातात, त्यांचं शिक्षण आदिवासींना नाही, असं मला वाटलं. उदाहरण द्यायचं झालं तर, 'शिकार करणे आणि वृक्ष तोड करणे'. इथं लहान मूल ही 'गुंटिल' म्हणजे धनुष्यबाण किंवा गलोल घेऊन लहान-लहान प्राण्यांची/पक्ष्यांची सर्रास शिकार करतात, किंवा झाडं तोडली जातात, किंवा पाण्याचा वापर खुल्या हाताने केला जातो.

'तुम्ही हे करताय, ते चुकीचं आहे. ते बंद करा.' असं मी सांगणार नव्हतो. कारण कितीही झालं, तरी त्या गोष्टी त्यांच्या संस्कृतीचा भाग आहेत, पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या परंपरा आहेत.

(आपल्याला ही एखादी पारंपरिक पद्धत बंद करायला सांगितलं, तर राग येतोच ना?)

एवढंच नाही तर, त्यांच्या पुस्तकात असलेली माहिती, जसं की, 'शिकार करणं वाईट असतं' हे ही कशा पद्धतीने त्यांना सांगावं, असा प्रश्न मला पडला होता.

मग उपाय काय? तर मी युट्यूब वरून काही व्हिडीओ डाऊनलोड केले. जे होते, 'माणूस आणि प्राण्यांचं एकमेकांवरच प्रेम' ह्यावर आधारित. किंवा,' प्राणी एकमेकांना करत असलेली मदत' ह्यावर. कित्येक व्हिडीओ तर साक्षात डॉ. प्रकाश आमटे ह्यांचेच होते.

व्हिडीओ दाखवल्यावर मी त्यांना , 'मी का दाखवतोय?' हे सांगितलं नाही. फक्त त्यांच निरीक्षण केलं. असे अनेक व्हिडीओ दाखवले. सुरवातीला मुलं 'एन्जॉय' करत होती. हळूहळू ती स्वतःच चर्चा करू लागली.

मग मी त्यांच्याकडे असलेल्या पाळीव प्राण्यांची नावं विचारली. तिथे कुणीच प्राण्यांची नावं ठेवली नव्हती. मग मी त्यांना आमच्याकडे असलेल्या पाळीव कुत्र्याविषयी, टायगर विषयी, सांगितलं. त्याचे फोटो दाखवले. माणूस अन प्राणी मित्र असू शकतो, हे त्यांना जाणवलं. प्राण्यांची फक्त शिकारच करायची

असते, ह्या त्यांच्या समजाला  अप्रत्यक्षरित्या बदलावयाचा माझा हा प्रयत्न होता.


मग झाड कसं वाढतं, बी चं रूपांतर रोपात कसं होतं ते दाखवलं. मुलांसाठी ती माहिती नवीन होती. मग इतक्या कष्टानं वाढणार झाड आपण सहज उपटून फेकून द्यायचं का? असं विचारलं.

नंतर आम्हाला शहरात पाणी विकत घ्यावे लागतं, एक टँकर घ्यायला हजारभर रुपये द्यावे लागतात, ह्यावर मुलांचा सुरवातीला विश्वासच बसला नाही. मग एक मुलगी म्हणाली, आपण इकडे पाणी वाया घालतो म्हणून दादाला पैसे देऊन पाणी विकत घ्यावं लागतं. अगदी टोकाचा नाही, पण थोडासा फरक नक्कीच पडत होता, हे मला जाणवलं.

'गरीब विद्यार्थी आणि आदिवासी विद्यार्थी' ह्यांची तुलना करणं, हे अनेक पातळीवर चुकीचं ठरू शकतं. समानता म्हंटल, तर फक्त 'पैशाची कमतरता' इतकंच असेल. मूलभूत

फरक आहे तो, 'वातावरण, संस्कृती, दुर्गमता' यांचा.

महाराष्ट्रातील इतर ठिकाणी गरीब विद्यार्थी असले, तरी त्या गावात काही सोयीसुविधा उपलब्ध असतात. शहरं जवळ



असतात. खराब असले तरी, रस्ते असतात. आणि मुख्य म्हणजे गेल्या अनेक पिढ्या घरात आणि आजूबाजूला शिक्षणाचं वातावरण निर्माण झालेलं आहे.

आदिवासी विद्यार्थी मात्र इथे कमी पडतो. घरात, गावात पूर्वीपासून शिक्षण नाही. काही ठिकाणी तर शिक्षण घेणारी पहिलीच पिढी आहे. घरात आईवडील तर अशिक्षित असतातच, तसंच 5,6 भावंडांमधून एखाद दुसरा शाळेत शिकत असतो. अशावेळी शाळेव्यतिरिक्त अभ्यास होत नाहींच. घरगुती गरजा ही वेगळया असतात. त्यामुळे, माझं निरीक्षण सांगायचं झालं तर, आदिवासी विद्यार्थी सध्या तरी फारच मागे आहे.

अर्थात, हे आहे फक्त 'पुस्तकी अभ्यासक्रमा बाबत'. क्रीडा प्रकारात आणि कला प्रकारात  आदिवासी बांधव अव्वल ठरतात. आणि नैसर्गिक जीवनाच्या शाळेत तर ते सर्वोत्तम आहेत. अगदी 6,7 वर्षांचं मुलं ही जंगलातील अनेकविध गोष्टींबद्दल माहिती बाळगून असतं. मासेमारी किंवा गुंटीलने अचूक नेमबाजी करणं, ह्यात तरबेज असतात.



काटकपणा, मेहनत ह्यात ते सहज इतर भागातील विद्यार्थ्यांवर मात करू शकतात.

ह्या तुलनेचा उद्देश 'कोण चांगलं, कोण वाईट' असा नसून, परिस्थितीमुळे पडलेला फरक दाखवणं, इतकाच आहे.

## एज्युकेशनल पर्सनॅलिटी # ३



मी जेव्हा मुलांना भेटलो, त्यांचं निरीक्षण करायला सुरुवात केली, तेंव्हा एक जाणवलं की, ही मुलं आज जरी आदिवासी भागात राहतात तरी उद्या जाऊन त्यांना शहरी भागात जाऊन शिक्षण घ्यावं लागणार आहे.

अशावेळी जीवनाच्या शाळेत त्यांनी बुजून जाऊ नये, किंवा न्यूनगंड वाटून घेऊ नये, ह्यासाठी मी त्यांना काहीसं वेगळं शिक्षण द्यायचं ठरवलं. अर्थात, वेगळं म्हणजे नवा दृष्टिकोन!

साधारणतः 2019 चा अर्धा डिसेंबर संपल्यावर 5वीची मुलं माझ्या ताब्यात आली. अर्थात ते 15 दिवस शाळेचा ओपन डे, गॅदरींग, सायन्स प्रोजेक्ट ह्यात गेले.. पण मला ही गोष्ट संधी म्हणून उत्तम वाटली. माझ्या 'माणसांचं निरीक्षण' करण्याच्या स्वभावानुसार मी मुलांचं ह्या वेगवेगळ्या प्रकारच्या परिस्थितीतलं निरीक्षण केलं.

निरीक्षण झाल्यावर मी काही नोंदी केल्या. माझ्या वर्गात 17 विद्यार्थी होते. मी त्यांच्या स्वभावानुसार आणि अभ्यास करण्याच्या पद्धतीनुसार 4 ग्रुप केले. प्रत्येक ग्रुपचा 'कॅप्टन/लीडर' निवडला. सर्वांना तो मान्य आहे की नाही, ह्यावर चर्चा केली. ह्यानंतर मला निवडायचा होता 'क्लास मॉनिटर'. माझ्या वर्गात 'विक्रम नावाचा एक मुलगा होता. विक्रममध्ये जन्मजात लिडरशीपचे गुण आहेत. त्यामुळे तोच क्लास मॉनिटर असणार, हे सर्व गृहीत धरून चालले होते.. अगदी तो स्वतःही आणि इतर शिक्षक ही.  जानेवारीच्या पहिला आठवडा संपल्यावर मी मॉनिटरचं नाव सांगणार होतो. 8 तारखेला माझ्या संपूर्ण वर्गाची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

मुलं सकाळपासून 'नाव सांग दादा' म्हणून मागे लागली होती. वर्गात गेल्यावर मी फळ्यावर काही गोष्टी लिहिल्या.



आणि मुलांना सांगितलं की, ह्या मुद्द्यांचा आधारे मी ह्या महिन्याच्या मॉनिटर निवडला आहे. म्हणजे मी प्रत्येकाला ह्या मुद्यांचा आधारे मार्क्स दिलेत आणि ज्याला जास्त मार्क, तो असणार मॉनिटर. मग तो कुणीही असू शकतो. ह्याचा मुलांना धक्का बसला. मला ते अपेक्षित होतं. अभ्यासात फारसा हुशार नसणारा विद्यार्थीही मॉनिटर असू शकतो, हे त्यांना नवीन होतं. मी प्रत्येक मुद्दा मुलांना समजावून सांगितला. त्याचं शालेय जीवनात असणारं महत्व, त्याचा फायदा समजावून सांगितला. 15 डिसेंबर ते 7 जानेवारी, ह्या कालावधीत ज्या विद्यार्थ्याने हे सर्व मुद्यात अधिक मार्क मिळवले होते तो विद्यार्थी होता, 'दीप्ती' नावाची मुलगी. दीप्ती ही तिच्या 'अर्थ (पृथ्वी)' ग्रुपची लीडर तर होतीच, पण आता ही दुहेरी जबाबदारी तिच्यावर असणार होती. तिने ती आनंदाने स्वीकारली. अर्थात, हे घोषित करताना मला, मुलांना दिप्तीची निवड योग्य का आहे हे समजावून सांगणं महत्वाचं वाटलं, विशेषतः विक्रमला. मला स्पर्धा निर्माण

करायची नव्हती, तर 'सहकार्य' हवं होतं. खरं तर माझे ही मुलं मुळातच निरागस होती, त्यामुळे मला त्यासाठी फारसं काही करावं लागलं नाही. सगळं खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडून मी ताण वाटणार नाही ह्याची काळजी घेतली. विक्रम सह सर्व मुलं आनंदात होती.  मात्र मी दिप्तीला आणि सर्व वर्गाला एक जाणीव करून दिली की, ही निवड फक्त 31 जानेवारी पर्यन्तचं आहे. 1 फेब्रुवारीला मार्क्सच्या आधारे  पुन्हा मॉनिटर निवडला जाईल. त्यासाठी प्रत्येकाला संधी आहे आणि प्रत्येकाने आपापल्या परीने प्रयत्न करायचेत. आपल्या ग्रुपला अधिकाधिक मार्क्स मिळावेत म्हणून प्रयत्न करायचे तर आहेतच, पण इतर ग्रुपला मदत देखील करायची आहे. प्रत्येक चांगल्या गोष्टीसाठी मार्क वाढवले जातील, अन मुद्दाम केलेल्या चुकीसाठी मार्क्स कापले जातील. अशा रीतीने 1 तारखेला 'ग्रुप ऑफ द मंथ' आणि 'मॉनिटर' निवडला जाणार आहे. हे मार्क्स मी मुद्दाम दररोज फळ्यावर सर्वांसमोर देत होतो. किती मार्क्स दिले, का कापले? हे त्यांना समजावून सांगत होतो. त्यांच्याशी चर्चा करून त्यांची बाजू समजावून घेत होतो.





# एज्युकेशनल पर्सनॅलिटी# ४

आपली जबाबदारी पार पाडताना मुलांकडून काही चूक झाली तर, रागावणं हा उपाय नव्हता. कारण ,'चुकते कई बातल आयो' ही शाळेची विचारसरणी आहे. म्हणजे चुकलं तरी, काही होत नाही असं म्हणून मी परत प्रयत्न करण्यासाठी प्रोत्साहन देत होतो. फक्त मुद्दाम टाळाटाळ केली तर मात्र गुण कमी करायचो. हे सर्व करत असताना, मी एक खबरदारी घेत होतो , ती म्हणजे की, इथल्या मुलांचा स्वतःचा नैसर्गिक स्वभाव बदलणार नाही. आदिवासी मुलांना स्वतःची मूलभूत प्रवृत्ती विसरून शहरी वृत्ती शिकवणं मला कुठेतरी चुकीचं वाटतं. शालेय अभ्यासक्रमात उपयोगी पडेल इतपरंच वेगळा दृष्टिकोन मी देत होतो.


ह्यासाठी मदत घेत होतो, ती वेगवेगळ्या प्रकारच्या व्हिडीओज ची, वेगवेगळ्या गोष्टींची. उदाहरण द्यायचं झालं तर, टीमवर्क काय असतं हे शिकवण्यासाठी मी अनेक गोष्टी सांगितल्या, व्हिडीओ दाखवले. टीमवर्क असताना अन नसताना कामात पडणारा फरक दाखवून दिला.

मध्यंतरी आर्मीचे काही जवान नेलगुंड्यात आले होते. येताना त्यांनी ट्रक्स मधून सामान आणलं होतं. सामान उतरवल्यावर ते ट्रक्स रिकामेच परत गेले, अन जवान मात्र त्यात न बसता चालत चालत आपल्या केंद्रात गेले. ही गोष्ट मी मुलांना लक्षात आणून दिली. मी त्यांना सांगितलं की, ते जवान सहजपणे गाडीत बसून जाऊ शकले असते. पण त्यांच्या पैकी कोणीही गाडीत बसलं नाही कारण त्यांना तशा 'इन्स्ट्रक्शन' नव्हत्या. त्यांच्या 'लीडर'ने त्यांना चालत यायला सांगितलं आहे, म्हणून त्यांचा लीडर इथे नसतानाही ते 'ऑर्डर फॉलो' करत आहेत. हा असतो एकमेकांवरचा विश्वास.

आपापल्याही आपल्या वर्गात हा विश्वास निर्माण करायचाय. म्हणजे आम्ही कोणीही दादा, ताई तुमच्या जवळ नसतानाही तुम्ही शिस्त पाळायला हवी. तुम्ही चांगलंच वागणार असा विश्वास आमच्यासोबत तुमच्या आईवडिलांना ही वाटायला हवा. ह्या सांगण्याचा फरक पडला. दररोज सकाळी असेंम्बली नंतर मुलं रनिंग साठी ट्रॅकवर धावतात. हे धावणं प्रत्येकाचं स्वतंत्र असं असतं. म्हणजे त्यात काही 'सिस्टीम' नसते.त्या दिवशी सर्व ग्रुप लिडर्सने एकत्र मीटिंग घेतली. काहितरी ठरवलं, जे मलाही माहिती नव्हतं. (तातडीची गरज पडली तर आणि तरच मुलांच्या विचारात अन कृतीत दखल द्यायची, हे तत्व मी स्वतःशी ठरवलं होतं आणि

अजूनही पाळतो. ) असेंम्बली झाल्यावर नेहमीप्रमाणे वेगवेगळे पळण्याऐवजी लिडर्सने पाच-पाच चा ग्रुप केला अन मग त्यांनी रनिंग केली. मला खूप आनंद झाला होता. त्यांचं असं सिस्टमॅटिक वागणं पाहून दुसऱ्या दिवसापासून बाकीची मुलं ही त्याप्रमाणे धावू लागली. अशीच शिस्त मुलं जेवणाच्या आधी, हात धुताना किंवा जेवायला जाताना दाखवू लागली. पण एक दोन वेळा मला असं वाटलं, की शिस्तीचा अतिरेक होतोय, तेव्हा मात्र मी त्याची दखल घेऊन, मुलांना अर्थातच त्याची जाणीव होऊ न देता, त्यात हस्तक्षेप करून, थोडी शिस्त कमी ही केली.

पण आनंदाची गोष्ट म्हणजे ,सेल्फ-डिसीप्लिनचं तत्व माझी मुलं शिकली होती. इतरांना शिकवीत होती.


Day Wednesday
Class 5th
Subject Mathematics
1> Helping
3> Planning
4> Study



## एज्युकेशनल पर्सनॅलिटी # ५

कुठल्याही लहान मुलाला कुतूहल हे जन्मजातच असतं. आजूबाजूच्या घडणाऱ्या घटनांचा मुलं आपापल्यापरीने अर्थ लावत असतात. तो अर्थ चुकीचा किंवा अपुरा असू नये, हे मोठ्यांच कर्तव्य असतं, असं माझं मत आहे.

नेलगुंडयातल्या मुलांनाही अनेक प्रश्न पडत असतात. पण इतर ठिकाणी जशी सहजतेने उत्तर मिळू शकतात, तशी उत्तर ह्यांना आजूबाजूच्या वातावरणातून मिळणं सहजशक्य नाही. कारण शहरात जसे आजूबाजूला विविध काम करणारे असतात, जसं की डॉक्टर, इंजिनिअर तसे इथ बघायला मिळत नाहीत. मग त्यांना प्रश्न पडतो की, हेलिकॉप्टर- मोबाईल अशा वस्तू तयार कोण करतं? डॉक्टर कसे बनतात? इत्यादीइत्यादी. अशावेळी मी मुलांना विविध करीयर बद्दल सांगायचो. अर्थात ती मुलं फक्त ५व्या वर्गाची होती म्हणून त्यांना सगळच समजत असेल असं नाही, पण कळत तर नक्की होतं. म्हणजे जर तुम्ही माझ्यासारखे इंजिनियर झाले तर, तुम्हाला रोबोट तयार करता येईल, डॉक्टर झाले तर मित्रांना बरे करू शकता, उद्या हा राकेश चांगला गायक होऊ शकेल, तर जान्हवी कदाचित चंद्रावर जाऊ शकेल..विक्रम अन रोहित चांगले

खेळाडू बनू शकतात..मग ह्यासाठी अभ्यास कसा अन किती महत्वाचा आहे, ह्यावर आमची चर्चा व्हायची.

असंच एकदा मी मुलांना अक्षयकुमार च्या 'गोल्ड' फिल्ममधील सहकार्यावर आधारित एक क्लिप दाखवली होती, ज्यात मेहनतीचं काम सर्वजण मिळून सोपं आणि कमी कष्टाचं करतात. ती युक्ती मुलांना खूप आवडली होती. पुढच्या श्रमदानाच्या वेळी वापरायची इच्छा ही त्यांनी मला बोलून दाखविली होती. लवकरच एक संधी त्यांना मिळाली.. अन मुलांनी त्याप्रमाणे श्रमदान करायला सुरुवात ही केली. पण झालं असं की, काही कारणाने आमच्यातील एका दादाचा काहीसा गैरसमज झाला, ते मुलांना रागावले. नंतर मुलांनी माझ्याशी ह्यावर चर्चा केली. मी मुलांना समजावलं की, आपण जी युक्ती वापरणार होतो, ती फक्त आपल्यालाच माहिती होती की नाही? मग ज्यांना ती माहिती नाही, त्यांचा गैरसमज होणं, हे साहजिकच आहे.अशावेळी 'आपण चांगलं काहीतरी करतोय' ह्याची जेव्हा आपल्याला खात्री असते, तेव्हा न थांबता, ते काम करत राहायचं. एक दिवस इतरांना पण त्याचं महत्व पटतं अन तेही आपल्यासोबत येतात.

ह्यावेळी मी त्यांना प्रकाश सरांचं उदाहरण दिलं. हे बोलणं झाल्याच्या दोन दिवसानंतर आम्हाला आमच्या शाळेच्या शेतात

श्रमदानाची संधी मिळाली. इथं मुलांनी अक्षयकुमारची युक्ती वापरली. कामाची ही पद्धत बाकीच्या सर्व मुलांनी पाहीली, अन लगेच त्यांनी ती युक्ती आत्मसात करून काम पूर्ण केलं. ते पाहून 5वीची मुलं माझ्याकडे आली अन आमचं जे बोलणं झालं त्याची आठवण करून दिली. आपण  चांगलं काम केलंय अन इतरांनी ते आत्मसात केलंय, ह्याचं त्यांना  अप्रूप वाटत होतं. सरजूचं म्हणनं आलं की, 'दादा तू आमचा अक्षय कुमार आहेस.'  मी म्हणालो, 'खरं तर आता या क्षणी तुम्ही सर्वजण आपल्या शाळेसाठी अक्षयकुमार आहात, कारण 100 पेक्षा अधिक मुलं तुमच्याकडे पाहून चांगल्या पध्दतीने काम करायला शिकली आहेत. मी नाही, तुम्ही हिरो आहात.'

मी मुलांसोबत फार फार तर 45 ते 50 दिवस (Working Days) होतो. लॉकडाऊनमुळे आमचं हे  शिक्षण पूर्ण नाही होऊ शकलं. पण मुलांमध्ये काहीसा फरक , अर्थातच चांगला, पडला होता, हे नक्की. इतर शिक्षक जेव्हा माझ्या मुलांचं कौतुक करायची तेव्हा माझ्या अंगावर मूठभर मांस चढायचं.. डोळ्यात आलेले आनंदाश्रू लपवायला चष्मा अशावेळी खूप उपयोगी पडला होता.




00:00:01

# एज्युकेशनल पर्सनॅलिटी # ६

मी आधीच सांगितल्याप्रमाणे माझ्या वर्गात 17 विद्यार्थी होते. त्यांचे मी एकूण 4 गट पाडले होते. अन प्रत्येक गटासाठी एक एक लीडर निवडला होता.

हे गट पाडताना मी मुलांच्या अंगभूत गुणांचा विचार केला होता. जसं की कुणी, खेळात अग्रेसर होतं, तर कुणी गणितात.कुणी निर्मिती चांगलं करायचं, तर कुणाचं मराठी छान होतं. कुणी इतरांची काळजी नीट घ्यायचं, तर कुणी मदतीला तत्पर असायचं. कुणाला बोलण्याची भीती वाटायची, तर कुणी सतत बडबड करत राहायचं. कुणी शांत, तर कुणी खोडकर.....

(पण एक गोष्ट मात्र 'कॉमन' होती, ते म्हणजे सगळीच मुलं गुणी होती,अन आहेत.)

प्रत्येकाचा अभ्यास करून मी  टीम्स तयार केल्या. आपापल्या टीमचं नाव मुलांनीच ठरवलं. मी फक्त ती नावं अभ्यासाशी निगडित असावीत, एवढीच अट घातली होती.

मग सोलर सिस्टीममधल्या ग्रहांची नाव ठरली, 'अर्थ, ज्युपिटर, व्हीनस अन मर्क्युरी.

अशी नावं निवडल्यामुळे आपोआपच मुलांच्या ती लक्षात राहणार होती.. मी मुलांनाही काही टोपण नावं दिली होती, (जसं की गलिव्हर, निअंडरथल), जी त्यांच्या पुस्तकातीलच होती,जेणेकरून तो तो भाग अथवा शिकवणं मुलांच्या मनात कायम रहावं.

हया टीम्स मध्ये मला स्पर्धा नको होती, पण सहकार्याची भावना निर्माण व्हायला हवी होती. पण स्पर्धा नसेल तर प्रगती कशी साधायची, हे आवाहन होतंच.



पण जसं आधी सांगितलंय, त्याप्रमाणे 'गुण' द्यायला सुरुवात केल्याने प्रगती साधली जात होती.

त्याचबरोबर वेगवेगळ्या 'प्रकारची' मुलं एकाच गटात असल्याने ती सर्व आपला गट मागे पडू नये म्हणून जिद्दीने काम करत होती. मराठी चांगलं असलेली पिंकी, इंग्लिश मध्ये हुशार असलेल्या आपल्या टीम लिडरची, म्हणजे मनिषाची मदत करत होती,

तर हिंदी नीट लक्षात ठेऊ शकणारी जान्हवी मॉनिटर असलेल्या दिप्तीची मदत करत होती.एक ग्रुप पाढयामध्ये चांगली प्रगती करत होता, म्हणून त्यांनी मराठी चांगलं असलेल्या ग्रुपसोबत हातमिळवणी करून दोन्ही ग्रुपचं टेन्शन हलकं केलं.

ह्यात माझं काम मी एका निरीक्षकांच ठेवलं होतं. हे सर्व करताना मुलं चुकत होती, गोंधळात पडत होती, कुरबुरी होत होत्या.  मी फक्त मध्यस्थ म्हणून मार्गदर्शन करायचो, अन जिथे परिस्थिती हाताबाहेर जातीये असं वाटायचं, तिथे मात्र मी 'दादा' असल्याची जाणीव करून द्यायचो.



जेव्हा मुलांचे ग्रुप तयार केले होते, तेव्हा मला मुलांना विशिष्ट पद्धतीने बसवायचं होतं, म्हणजे मला प्रत्येक विद्यार्थ्यांकडे नीट लक्ष देता आलं असतं. नाश्त्याच्या सुट्टीनंतर तशी अरेंजमेंट करायचं मी मनाशी ठरवलं होतं. परंतु नाश्ता झाल्यावर वर्गात आल्यावर मी पाहिलं की, मुलं काहीतरी करत आहेत. दीप्ती अन

विक्रम कडे प्रत्येकी एक एक काठी होती. ती दोघे त्या काठीने अगदी सेंटीमीटरचं माप घेऊन , जराही इकडे तिकडे न होऊ देता काही खुणा करत होती..

मी पाहत होतो. काही वेळाने त्यांचं काम संपलं. बाकीचे सगळे तोपर्यंत आले होते. लिडर्सने त्यांना काय करायचं ते आधीच , नाश्त्याच्या वेळीच सांगितलं होतं.

आमच्याकडे मुलांना अभ्यासासाठी चौरंग दिले आहेत, जे समोर घेऊन ते अभ्यास करतात. प्रत्येकजण आपापला चौरंग घेऊन आला, अन त्या त्या विशिष्ट जागीच आपला चौरंग ठेवला एक मिलिमीटर ही इकडे तिकडे होऊ नये, ह्याची खात्री करून घेतली जात होती.

खरंतर हे मी ठरवल्यापेक्षा खूपच वेगळं होतं, पण चुकीचं नव्हतं. मुलांचा मन राखण्यासाठी अन लिडर्सचा मान रहावा म्हणून मी ती अरेंजमेंट आनंदाने मान्य केली.

माझी मुलं पुढाकार घेऊन हे सगळं करत आहेत, म्हणजेच आपली 'टीम सिस्टीम' त्यांना आवडली आहे, ह्याची ती पावती होती.

## “शैक्षणिक हेतूचा पाठपुरावा:

## ब्रेकिंग द इम्पेक्ट ऑफ कोरोना "

कोविड -१९ (साथीचा रोग) ने  सर्व देशभरातील शालेय शिक्षणाची लय बिघडवून टाकली आहे.  कोरोनामुळे सरकारने मार्गदर्शक तत्त्वे पालन करावयास सांगितली अन 18 मार्चपासून अकाली उन्हाळी सुट्टीची सुरुवात झाली. अन आम्हाला (साधना विद्यालय, नेलगुंडा) अनिश्चित कालावधी साठी दुर्दैवाने बंद करावी लागली.

तथापि, महाराष्ट्र सरकारने शैक्षणिक नुकसान  कमी करण्यासाठी दिलेला उपाय ,(जसे की ‘ऑनलाइन लर्निंग’ किंवा पाठ्यपुस्तक पीडीएफ डाउनलोड आणि शैक्षणिक दूरदर्शनचे कार्यक्रम) आमच्या शाळेत  लागू होणे शक्य नव्हतं. त्यामागची कारणे होती, अर्थातच मोबाईल कनेक्टिव्हिटीचा अभाव, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्मार्टफोनची उपलब्धता आणि योग्य पायाभूत सुविधा.

समीक्षा ताई अन आम्ही सर्व शिक्षकांनी विचारमंथन करून एक उपाय योजना आखली, अन ती म्हणजे " शिक्षण आपल्या दारी”. ह्यात आम्ही काही ठरवलेली उद्दीष्टे अशी: १. मुलांच्या सध्याच्या इयत्तेच्या अभ्यासाची उजळणी २. पुढील इयत्तांचा अभ्यासक्रम शिकवणे.

या उपक्रमाला लोकबिरादरीचे संचालक अनिकेत आमटे यांनी पाठिंबा दर्शीविला. ही उद्दीष्टे साध्य करण्यासाठी, ती कशी पूर्ण करायची यावर आम्ही पुन्हा चर्चा केली. कारण आमच्याकडे पायाभूत सुविधा व इतर सोयींचा अभाव होता. मग आम्ही ठरवलं की, स्थानिक शिक्षक खेड्यातच राहतील आणि इतर शिक्षक दररोज प्रवास करून विविध खेड्यात जातील.

आम्ही 130 विद्यार्थ्यांची संख्या त्यांच्या गावानुसार विभागली. प्रत्येक गावात 20 विद्यार्थ्यांमागे 1 शिक्षक असं ठरवलं. आमची गावं किंवा सेंटर होती "नेलगुंडा, गोंगवाडा, भटपर, मिडदापल्ली आणि परायणार.

आम्ही सर्व शिक्षकांनी आवश्यक सामग्री, जसे की बोर्ड, स्टोरी बुक्स, शालेय पुस्तके, आणि नोटबुक घेऊन सेंटरवर

गेलो.त्याचबरोबर लॅपटॉप, मोबाईल अँप्स , टॅब्लेट इत्यादी शैक्षणिक साधनांनी आम्ही सुसज्ज होतो.

प्रकल्पाच्या अनेक दशकांपासून केलेल्या प्रयत्नामुळे, प्रचारामुळे 'शाळा आपल्या समुदायाचा अविभाज्य भाग आहे' हे आदिवासी बांधवाना समजलं होतं.म्हणून आमच्या या उपक्रमाला पालकांनी मोठ्या प्रमाणात समर्थन दिलं.अन सुरू झालं आमचं शिकवणं.

अर्थात जागेचा प्रश्न होताच. काही ग्रामस्थांनी त्यांच्या स्वत: च्या घरामागील अंगण शिकवायला दिलं. आणि जिथे जागा पुरेशी नव्हती,तिथे हे वर्ग एखादया झाडाखाली घेण्यात आले.

सुरुवातीला, शिक्षकांनी कोरोनासंबधीत उपाययोजना काय कराव्यात, ह्यावर विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केलं. शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना मास्क वाटप केले. तसंच हात धुण्यासाठी साबण पुरवले.आमचे दररोजचे वर्ग सरकारने घालून दिलेल्या निकषांचे पालन करून 30 जूनपर्यंत चालले. नंतर मात्र पाऊस सुरू झाल्याने हा उपक्रम बंद करावा लागला.







## This is Pure Love ♡

शाळेचा शेवटचा दिवस सगळ्यांच्याच आयुष्यात येतो..

फारच भावनिक क्षण असतो तो.. आपली शाळा, त्या भिंती, ते बेंचेस काही एक परत दिसणार नाही म्हणून एक अनामिक बेचैनी घर करून राहते.. सगळ्यांचंच होतं.तुमचंही अन माझंही..

आपण त्याबद्दल नंतर आठवणीही काढतो.. पण दोन दिवसांपूर्वी एक घटना पाहण्यात आली, अन आपलं 'शाळेवरचं प्रेम खरंच विशुद्ध होतं का?' असा प्रश्न पिंगा घालू लागला..

प्रश्न पडण्याचं कारण आधी सांगतो.. जरी शेवटच्या दिवशी आपण शाळेबद्दल भावनिक झालो, तरी आपण गेली कित्येक वर्षे शाळेला नावंच ठेवत आलेलो असतो.. पण फक्त शेवटच्या दिवशी वाईट वाटतं.

पण जो प्रसंग मी सांगणार आहे, त्यावरून माझ्या लक्षात आलं, की शेवटच्या दिवशी जे काही वाटतं, ती फक्त एक प्रासंगिक

भावना असते.. त्याला "Pure Love" असं म्हणणं थोडसं घाईचं वाटतं.

कोरोनामुळे ह्या मुलांना मार्च मध्येच घरी जावं लागलं.. 15 दिवसांनी परत यायचंच आहे, म्हणून ही मुलं फक्त पुस्तकं आणि वह्या बरोबर घेऊन गेली. म्हणजे त्यांचं शाळेतलं दप्तर, त्यात पेन्सिल इत्यादी साहित्य, जेवणाचं ताट वगैरे सगळंच शाळेच्या वर्गातच राहिलं.. मे महिन्यात मुलांना त्यांचा रिझल्ट आणि TC ही देऊन टाकली..

परवा साडे तीन महिन्यानंतर  ही मुलं राहिलेलं साहित्य घ्यायला आली. वर्ग मार्चपासून बंदच होता,त्यामुळे फारसा घाण झाला नव्हता. पण चोहोबाजूंनी जंगल असल्याने पालापाचोळा अन थोडीफार धूळ वर्गात जमली होती..

ह्या मुलांनी ते पाहिलं, अन क्षणार्धात, 'आपला वर्ग किती घाण झालाय' असं म्हणून कोपऱ्यातील 2,4 झाडू घेऊन सर्व अगदी स्वच्छ करून टाकलं..

मी समोरच होतो.. त्यांनी ना मला  'हे साफ करू का? म्हणून विचारलं, ना 'हे आपण करायला हवं का'? असला  विचार केला..

एकाच्याही मनात, 'आता हा आपला वर्ग राहिलेला नाहीये, इतकंच काय तर शाळाही आपली नाहीच आता' असला कोता, मतलबी  विचार आला नाही.

मी नेहमी मुलांची टिंगल करतो, चिडवतो.  ते ही माझ्यासोबत चिडवाचिडविचा खेळ खेळतात..

मुलं जेव्हा झाडू लागली, तेव्हा मी चिडवण्यासाठी, 'हा वर्ग, ही शाळा तुमची  कुठाय आता?' असं म्हणणार होतो.....

...पण मुलांच्या प्रेमातून निर्माण झालेल्या त्या कृतीची  टिंगल करण्याचं धाडस मला झालं नाही..

प्रेमाच्या संस्कारापुढे टिंगलीचा विकार कधीच लोप पावला होता.

मी त्या कृतीने इतका भारावून गेलो की मला पूर्ण दिवस भरून आल्यासारखं वाटत होतं.

आपल्या शाळेवर इतकं विशुद्ध प्रेम करणं आपल्याला जमलं होतं का? हा प्रश्न ही तेव्हापासून भिंगा घालतोय.. शाळा सोडताना वाईट वाटणं ही एक तात्कालिक भावना असते, हे तेव्हा कळलं. पण 5 वीच्या चिमुकल्या मुलांच्या मनातून निर्माण झालेलं हे प्रेम,

आपलेपणा, हे नैमित्तिक नव्हतं,तर चिरकाल टिकणार शाश्वत सत्य आहे.

कारण आपण जेव्हा 5 वी मध्ये होतो,(लक्षात घ्या आपण 15,16 वर्षांचे जाणते झाल्यावर शाळा सोडतो.) तेव्हा आपण असा विचार केला असता का? अन तेही TC वगैरे सोपस्कार आधीच पार पडल्यावर? भले आपण नंतर मोठेपणी आपल्या शाळेसाठी देणग्या देऊ, मदत करू, पण त्याची बरोबरी ह्या निरागस प्रेमाशी नाही होऊ शकणार.



एक शिक्षक म्हणून हे माझं यश आहे का? तर नाही. कारण गेले काही महिनेच मी मुलांबरोबर आहे..

जिथे शिक्षकांना, 'सर,मॅडम' ऐवजी 'दादा, ताई' म्हंटल जातं, तिथे हे प्रेम, आपुलकी ह्या शाळेच्या कणाकणातच भिनलेली आहे.

लोकबिरादरीच्या सेवारूपी वृक्षाला आलेली ही 'फळे रसाळ गोमटी' आहेत.

शुद्ध बीजापोटी विशुद्ध प्रेमाचं बीज जोपासलं जातंय.



# लिंबू महोत्सव



भारतीय माणूस मुळातच उत्सवप्रिय.. कायम आंनद देणारी हो गोष्ट..

पण कोरोनामुळे सध्या उत्सवाला काही प्रमाणात खंड पडला..

जरी  भामरागड, हेमलकसा आणि आजूबाजूची काही गावं पहिल्यापासूनच 'ग्रीन झोन' मध्ये आहेत, तरी गेले 3-4 महिने

आमची लोकबिरादरीही "क्वारनटाईन" च्या नियमाला अपवाद नाही. इथली सर्व स्त्री, पुरुष, लहान मुलं आपल्या दररोजच्या कामात गुंतून पडलेली असली, तरी उत्सवाला अन पर्यायाने उत्साहाला खीळ बसली होती..

पण जसा मान्सून दाखल झाला अन इथला निसर्ग रमणीय होऊ लागला आणि तोच उत्साह प्रकल्पाच्या लोकांत ही पाझरू लागला.. आणि प्रकल्पातील 200,250 जणांच्या आमच्या कुटुंबातील प्रत्येकाला एकत्र यावं वाटू लागलं. ह्या भावनेतून एका कल्पनेचा उगम झाला, तो म्हणजे 'लिंबू महोत्सव'.

सध्या प्रकल्पात लिंब विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. कोणीतरी म्हणूनच ठेवलंय की, When life gives you lemons, make lemonade. ह्या उक्तीला अनुसरून प्रकल्पाने 'लेमन फेस्टिव्हल' करायचा ठरवलं. आणि ह्याचा श्रीगणेशा केला बच्चेमंडळीने.

लिंबू गोळा करण्यापासून , ती कापून, त्यांचा रस गाळून छानसं लिंबू सरबत तयार केलं. कोणाला कच्ची लिंब हवी असतील तर ती ही विक्रीस ठेवली होती.. गेल्या दोन, तीन आठवड्यात प्रकल्पातल्या प्रकल्पात ह्या बच्चेकंपनीने किमान 5 ते 6 वेळा हा उपक्रम राबविला, तो ही आनंदाने..

आनंदाने आनंद वाढतो म्हणतात. ह्या आनंदाची लागण मोठ्यानं न होती, तर नवलच.

बच्चेमंडळीचा अनुभव हाताशी होताच. त्याचा उपयोग करून प्रकल्पातील महिला मंडळाने लिंबापासून अनेकविध पदार्थ तयार केले. लिंबाचा केक, जॅम, जेली, लेमन राईस, चटणी, लोणचं, डिश वॉश इत्यादी प्रकार कल्पकतेने तयार करण्यात आले. ह्यात मुलांनी लिंब गोळा केली, रस काढला, सामान आणण्यास, ठेवण्यास मदत केली.

आणि 5 जुलैला डॉक्युमेंटरी हॉलमध्ये 4 वाजता ह्याचं उद्घाटन झालं.

कुटुंबातील आम्ही सर्व सदस्य, कोरोनामुळे एकमेकांपासून अनेक दिवस दूर होतो. ती ह्या निमित्ताने एकत्र जमलो, भेटलो. ह्या उत्सवाने, खरं तर सणाने, आम्हाला आंनद दिला, उत्तेजित केलं, निराशेच्या काळात आशेचा धागा परत एकदा घट्ट विणला.

अर्थात हा परिसर पुर्वीपासूनच ग्रीन झोन मध्ये असल्याने, आणि गेल्या कित्येक महिन्यात प्रकल्प बाहेरील लोकांसाठी बंद असल्याने इथे कोरोनाचा धोका संभवत नव्हता. त्यामुळे मास्क आपसूकच बाजूला काढून सर्वांच पूर्वीचंच चिरपरिचित हसू आम्ही पुन्हा एकदा अनुभवलं. अगदी हसतखेळत ह्या दिवसाची सांगता

झाली, तीदेखील पुढे जाऊन अजून काही तरी करायचंच ह्या विचाराने.

मला वैयक्तिक पातळीवर भावलेली गोष्ट म्हणजे ह्यातून मुलांना मिळालेली शिकवण. त्याआधी चांदोबतील एक जुनी गोष्ट सांगतो. 'एक मुलगा आईला विचारतो की, हे आकाश जे आहे, ते अधांतरीच कसं काय उभं आहे? त्याला खांबच नाहीयेत. ते कोसळणार नाही का?' आई म्हणते,' बाळ, समाजात काही चांगली माणसं असतात.जी इतरांची मदत करतात, त्यांच्याशी प्रेमाने वागतात. इतरांना जगवतात.हीच माणसं आभाळाचे अदृश्य खांब असतात. त्यामुळे आभाळ कोसळण्याचं भय आपल्याला नाही.'

ही गोष्ट सांगण्याचं कारण म्हणजे,लहान मुलं मोठ्यांच अनुकरण करतात. ह्या उत्सवातून काही रक्कम जमा झाली होती. मुलांचे आईवडिल ते पैसे मुलांना 'हे घे तुझ्या कमाईचे पैसे' म्हणून सहज देऊ शकले असते. अर्थात त्यात चूक नव्हतं काही, पण नकळतपणे खर्चायला पैसे मिळावेत म्हणून 'स्वतः साठी अधिकाधिक पैसे कमवायची इच्छा कदाचित मुलांना झाली असती'.आणि त्यातून मिळणाऱ्या निस्सीम आनंदाला ती पारखी झाली असती. उत्सवाचा गाभा हरवला असता..



पण त्यांनी तसं न करता ती सर्व रक्कम 'महारोगी सेवा समिती, वरोरा' ह्या नावाने देणगीत दिली. ह्यातून मुलांना आपसूकच, "पैशापेक्षा कामातून मिळणारा आनंद महत्वाचा असतो." ही शिकवण गेली.

हीच शिकवण पुढं जाऊन प्रकल्पातील ह्या मुलांना आभाळाचे, समाजाचे भक्कम खांब बनवणार आहे.

आनंदाला, मानवतेला भरभक्कम आधार देणार आहेत.



# विश्रांती

समारोपाचं इतक्या लवकर लिहायला लागेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. अगदी अनपेक्षित अन अचानकपणे मी प्रकल्प सोडला.

त्याचं झालं असं की, गेले 9,10 महिने मी घरी आलोच नव्हतो. कोरोनामुळे अजूनच लांबत चाललं होतं. अन अचानक प्रकल्पात एका कार्यकर्त्याचे नातेवाईक कार घेऊन आले होते, त्यांच्यासोबत मी औरंगाबादला आलो.

यायच्या आदल्या दिवशी मी खुपंच भावुक झालो होतो. इतक्या दिवसांची सर्वांची सवय झाली होती. प्रकल्प म्हणजे माझं दुसरं कुटुंब झालं होतं.. खरंतर अजूनही आहे.

इथल्या सगळयांची आठवण येते.. शाळेची पोरं डोळयासमोर आहेतच.. मुलांची अन शाळेची आठवण तर प्रत्येक क्षणी येतंच असते.

आपल्या व्यस्त कामकाजातून वेळ काढून मला हवं-नको ते विचारणाऱ्या अनिकेत सरांना परत भेटायचंय..

शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन प्रयोग करू इच्छिणाऱ्या समीक्षा ताईसोबत काम करायचंय..

अस्वस्थ  तब्येत दुरूस्त करून घेण्यासाठी दिगंतसर आणि अनघा ताईला भेटायचंय.

'कसा आहेस रे आज?' असं दररोज न चुकता विचारणाऱ्या आत्याला भेटायचंय.. नेगल इत्यादी पुस्तकं लिहिणाऱ्या आतोबाना भेटायचंय..

फोडणीची मॅगी आणि इतर अनेक नव्या पदार्थांचा प्रयोग माझ्यावर करणाऱ्या तुषार सरांना भेटायचंय..डॉक्टर मित्रांसोबत भटकंती करायला जायचंय.

पांचाळ काकांच्या घरी जाऊन हक्काने खिचडी करायला सांगण्यासाठी मला परत जायचंय..

आमच्या रेला सोसायटीच्या प्रेमळ सदस्यांच्या सोबत अनेक आठवणी तयार करण्यासाठी जायचंय..

अनेक जुन्या आठवणींना उजाळा देणाऱ्या भाऊजी काकांच्या व्हाट्सएपच्या पोस्ट वाचायच्यात.

मुलांना तर मी विसरू शकत नाहींच. फावल्या वेळेत प्रकल्पातल्या मुलांना शिकवायचंय.. दुसरी तिसरीची मुलं मला

ABCD शिकवीत होती, ती पूर्ण करण्यासाठी प्रकल्पात परत जायचंय..

तसचं लहान मुलांची vocabulary वाढावी म्हणून एक प्रयोग सुरु केला होता, तो पूर्ण करायचाय..

लॉकडाऊनमध्ये गावोगावी जाऊन माझ्या शाळेतल्या मुलांचं शिक्षण पूर्ण करण्यासाठी मला जायचंय..

गोपाळकाला, गणपती, वेगवेगळे सण एकत्र साजरे करण्यासाठी, भजनात रात्र जागवण्यासाठी परतायचं आहे..

आत्या एकदा मला म्हणाल्या होत्या की, आम्ही सर्वांनी पाया तयार केलाय.. आता तुमच्या सारख्यांनी त्याच्यावर कळस चढवायचा आहे.. पण मला हे मान्य नाही. मी आत्याला म्हणालो की, ‘आत्या संपूर्ण मंदीर तुमच्या पिढीनेच बांधून ठेवलयं.. माझं काम आहे ते ह्या मंदिराची साफसफाई करण्याचं, त्याची देखभाल करण्याचं’.. लोकबिरादरीच्या सेवारूपी मंदिरासाठी मल परत जायचयं..

प्रकाशसर आणि मंदा ताईंचा आशिर्वाद घ्यायला, त्यांच्याकडून जीवनाचा दृष्टिकोन समजून घ्यायला , त्यांच्या कार्यात खारीचा वाटा उचलायला मला जायचंय.

हे लिखाण सुरु करताना मी ह्याला ‘साठवण’ असं नाव दिलं होतं.. म्हणजे वर्तमानकाळात आपण करतो ती साठवण.. अन भूतकाळातली असते ती ‘आठवण’.. अनपेक्षितपणे साठवण आता आठवण झालीये..

दिवाळी साजरी करून परत एकदा येणार, अशी इच्छा व्यक्त करून मी प्रकल्प सोडलाय..

ती इच्छा पूर्ण होण्यासाठी तुम्हा सर्वांच्या सदिच्छा पाठीशी हवीयं..





मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.



मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वत:ही लिहायला हवं.

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com